७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
बुधवार, दि. ०१ जुलै २०२६

www.dainikesandhya.com
www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १८६ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ३ रूपये

# १५ हजार कंत्राटी कर्मचारी झाले ‘परमनंट’

## ७ व्या वेतन आयोगानुसार मिळणार पगार

**मुंबई (दै. संध्या)**

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राज्यभर कार्यरत असलेल्या 10 वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या 15 हजार 10 कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. या कर्मचाऱ्यांसाठी समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदे निर्माण करण्यास आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या वार्षिक 1153.60 कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देणारा शासन निर्णय आज निर्गमित केला आहे. या निर्णयामुळे राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर तसेच राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समायोजनासाठी विशेष पाठपुरावा केला असून त्यानुसार आज हा शासन निर्णय घेण्यात आला. यापूर्वी 14 मार्च 2024 रोजी मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार 10 वर्षांपेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनाचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर 4 नोव्हेंबर 2025 रोजी या निर्णयात सुधारणा करण्यात आली. तसेच, या कर्मचाऱ्यांच्या समायोजनासाठी निकष निश्चित करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली आंतरविभागीय समितीची स्थापना करण्यात आली होती. या समितीच्या शिफारशी आणि 25 जून 2026 रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार आजचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

शासन निर्णयानुसार, 25 जून 2026 या मंत्रिमंडळ बैठकीच्या दिनांकापर्यंत तांत्रिक खंड वगळून सलग 10 वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कंत्राटी सेवा पूर्ण केलेल्या



14,010 कर्मचाऱ्यांना एकवेळच्या विशेष बाब म्हणून समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदांवर नियुक्ती देण्यात येणार आहे. यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग आणि ग्रामविकास विभागातील नियमित मंजूर पदांशी संबंधित कंत्राटी पदांची समकक्षता निश्चित करण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार इतर विभागांतील समकक्ष पदांचाही विचार केला जाणार आहे.

पदांची समकक्षता निश्चित करताना संबंधित पदाचे कामाचे स्वरूप, जबाबदाऱ्या, शैक्षणिक पात्रता, सेवा प्रवेश नियम, सध्याचे मानधन आणि सातव्या वेतन आयोगानुसार लागू असलेली वेतनश्रेणी यांचा विचार केला जाईल. वित्त विभागाची आवश्यक मान्यता घेतल्यानंतर संबंधित विभागांकडून अधिसंख्य पदे निर्माण करून पात्र कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. या कर्मचाऱ्यांना समकक्ष पदाच्या वेतनश्रेणीतील किमान मूलभूत वेतन, महागाई भत्ता आणि प्रवास भत्ता देण्यात येईल. तसेच सध्या मिळत असलेले वेतन संरक्षित राहील. मात्र, या कर्मचाऱ्यांना पदोन्नती, आश्वासित प्रगती योजना, निवृत्तीवेतन अथवा कुटुंब निवृत्ती वेतनाचा लाभ मिळणार नाही. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सध्या लागू असलेल्या रजाच त्यांना लागू राहतील.

शासन निर्णयात अधिसंख्य पदे ही व्यक्तीसापेक्ष असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. संबंधित कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर, राजीनामा दिल्यानंतर किंवा अन्य कारणांनी सेवा संपुष्टात आल्यानंतर ती पदे आपोआप रद्द होतील आणि त्या पदांवर नवीन नियुक्ती करता येणार नाही. या कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीही मिळणार नाही. यापुढे अशा प्रकारची नियमितीकरणाची प्रकरणे निर्माण होऊ नयेत म्हणून राष्ट्रीय आरोग्य अभियानातील मनुष्यबळाच्या सेवा भविष्यात प्रामुख्याने बाह्यस्त्रोत किंवा सेवा करार पद्धतीने घेण्याचेही शासनाने स्पष्ट केले आहे. तसेच, भविष्यातील पदनिर्मितीबाबतचे निर्णय वित्त विभागाच्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेनेच घेतले जाणार असल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

# ‘ऑपरेशन टायगर’ नव्हे, ‘ऑपरेशन देवेंद्र फडणवीस’ : आदित्य ठाकरे

**मुंबई (दै. संध्या)**



शिवसेना ठाकरे गटाला आणखी एक मोठा धक्का बसला असून सचिन अहिर यांनी ठाकरे गटाला रामराम करत थेट शिंदे सेनेकडून उपसभापती पदाचा अर्जही भरला आहे. त्यामुळे हा उद्धव ठाकरे यांच्यासह आदित्य ठाकरे यांनाही मोठा धक्का असल्याचे मानले जात आहे. यावर आता आदित्य ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ज्यांना सगळे दिले तेच स्वार्थासाठी सोडून जात असल्याची टीका ठाकरे यांनी केली आहे. आदित्य ठाकरे म्हणाले, आम्ही गेले अनेक दिवस पाहत आहोत, ज्या लोकांना सगळं काही मिळतं तेच स्वतःच्या स्वार्थासाठी निघून जात आहेत. यात धक्का बसण्यासारखे काही नाही. वरळी, शिवडी हा आमचा बालेकिल्ला आहे आणि तिथे आमचे काम बोलते. पण एकच दुर्दैव आहे की ज्यांना आम्ही सगळे काही दिले, बरं ही एक व्यक्ती अशी आहे की आदित्य ठाकरे भेटत नाही, असं नव्हतं. परवा येताना आम्ही पुण्यातून सोबतच आलो. एवढे असूनही तुम्हाला अजून काय पाहिजे आहे, अजून किती ओरबाडणार आहात? पुढे बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, स्वतः आमदार आहेत, जी प्रभाग समिती आहे त्यांच्या मुलीला आम्ही एनजीओचा जो कोटा असतो त्यातून समिती दिली आहे. कामगार सेनेत पद दिले होते, शिवसेनेत पद दिले होते. एवढे सगळे होऊन देखील बीएससी तर आहेच, अजून तुम्हाला काय पाहिजे? आम्ही काही कमी दिलं का? रोज भेटत होतो? रोज काय करायचे होते तुमच्यासाठी? आरत्या करायच्या होत्या का? असा सवालही ठाकरे यांनी केला आहे. लोकशाहीचे काय होणार, संविधानाचे काय होणार, असे अनेक विचार आहेत.

# मुंबईत पावसाचा जोर वाढला, अंधेरी सबवे पाण्याखाली, वाहतूक बंद

**मुंबई (दै. संध्या)**

राज्यातील बहुतांश भागात पावसाला सुरुवात झाली आहे. काही भागात पेरणीच्या कामांना देखील वेग आल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. तर काही भागात आणखी चांगल्या पावसाची गरज आहे. दरम्यान, आज मुंबईत देखील पावसाचा जोर चांगलाच वाढल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मुंबईसह पालघर, भिंवडीत जोरदार पाऊस सुरु आहे. मुंबईत सुरू असलेला मुसळधार पावसामुळे अंधेरी सबवे पाण्याखाली गेला आहे. अंधेरी सबवे बाहेर 2 ते 3 फूट पाणी भरल्यामुळं तो वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. अंधेरी सबवे बाहेर पोलिसांनी बॅरिकेट आणि रस्सी लावून बंद केली आहे. अंधेरी सबवे बंद असल्यामुळे अंधेरी पूर्व आणि पश्चिम परिसरात मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. वाहतूक कोंडी काढण्याचं काम वाहतूक पोलिसांकडून युद्धपातळीवर सुरू आहे. तर अंधेरी सबवे बंद असल्यामुळे गोखले पुलाचा वापर करा असा वाहन चालकांना वाहतूक पोलिसांकडून सूचना दिली जात आहे. दुसऱ्या बाजूने अंधेरी सबवेमध्ये पालिकेकडून मोटर पंप लावून पाणी काढण्याचे काम देखील सुरु करण्यात आले आहे. पालघर जिल्ह्यात



काही दिवसापूर्वी मान्सूनचे आगमन झालं होतं परंतु समाधानकारक पाऊस होत नव्हता. मात्र कालपासून पावसाने जिल्ह्यात जोर पकडला असून जिल्ह्यात पहाटेपासून जोरदार पावसाने सुरुवात केली आहे. याचाच परिणाम म्हणून शेतांमध्ये पाणी साचायला सुरुवात झाली आहे. तर शहरांमधील सकल भागांमध्ये सुद्धा ठीक ठिकाणी पाणी साचायला सुरुवात झाली आहे. तर अगदी जून महिना संपत असताना जोरदार पाऊस सुरू झाल्याने नागरिक तसेच शेतकऱ्यांमध्ये समाधानाचं वातावरण निर्माण झाले आहे. जिल्ह्यातील जव्हार मोखाडा विक्रमगड भागात मोठ्या प्रमाणात पाऊस नसल्याने पाणीटंचाई जाणवत होती. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या भात पेरण्या खोळंबल्या होत्या मात्र हा चांगला पाऊस सुरू झाल्याने पाणीटंचाईचे संकट वाढण्याची शक्यता निर्माण झाली असून भात पेरण्याही सुरू होत आहेत.

# ‘मी जे करतो ते फुल प्रूफ करतो’ : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## सचिन अहिरांच्या पक्षप्रवेशावर फटकेबाजी, उद्धव ठाकरेंवरही साधला थेट निशाणा



**मुंबई (दै. संध्या)**

शिवसेना ठाकरे गटाला आणखी एक मोठा धक्का बसला असून सचिन अहिर यांनी ठाकरे गटाला रामराम करत थेट शिंदे सेनेकडून उपसभापती पदाचा अर्जही भरला आहे. त्यामुळे हा उद्धव ठाकरे यांच्यासह आदित्य ठाकरे यांनाही मोठा धक्का असल्याचे मानले जात आहे. त्यामुळे राज्यात ऑपरेशन टायगर सुरूच असल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात सुरू आहे.ठाकरे गटाचे आमदार सचिन अहिर यांनी विधान परिषद उपसभापतीपदासाठी महायुतीकडून उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. या घडामोडीनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत सचिन अहिर यांचे पक्षात स्वागत केले आणि उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार निशाणा साधला. "आम्ही कोणतेही तोडकाम करत नाही, जोडकाम करतो," असे सांगत शिंदे यांनी शिवसेनेत प्रवेश करणाऱ्या नेत्यांमागे विकासाचा अजेंडा असल्याचा दावा केला.

पत्रकार परिषदेत बोलताना शिंदे म्हणाले, "नुकतेच सहा खासदारांनी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. आज सचिन अहिर यांनीही आमच्यासोबत येण्याचा निर्णय घेतला आहे. काही लोक सहा मतदारसंघांमध्ये जाऊन आले आणि त्यांचे सचिन अहिर यांनी षटकार मारून स्वागत केले आहे. खरं तर चौकार-षटकार सुरूच राहतील आणि समोरच्यांच्या विकेट्स पडतच राहतील."

सचिन अहिर यांच्या राजकीय प्रवासाचा उल्लेख करत शिंदे म्हणाले की, "सचिन अहिर हे माजी राज्यमंत्री आहेत. गिरणी कामगारांचे नेते म्हणून त्यांनी मोठे काम केले आहे. विविध कामगार संघटनांमध्ये त्यांनी नेतृत्व केले. मुंबईतील भूमिपुत्र, कोळीवाडे आणि स्थानिकांच्या प्रश्नांची त्यांना सखोल जाण आहे. ते ग्रासरूट स्तरावर काम करणारे नेते आहेत. त्यामुळे त्यांच्या आगमनाने शिवसेनेची ताकद आणखी वाढणार आहे."

एकनाथ शिंदे म्हणाले, सचिन अहिर यांनी आज विधानसभा उपसभापती पदाचा फॉर्म भरला आहे, महायुतीचा फॉर्म भरला आहे. महायुती आज बहुमतात आहे. त्यामुळे ते उपसभापती म्हणून उद्या त्यांची निवड होईल आणि ते फक्त मुंबईच नाही तर महाराष्ट्रात उपसभापती म्हणून न्याय देण्यासाठी काम करतील. ते आल्यामुळे शिवसेनेची देखील ताकद वाढली आहे. कामगार क्षेत्र असेल, मुंबई असेल पुणे असेल, त्यांनी जिथे काम केले आहे तिथे ताकद वाढेल.

### हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे आणि या पक्षात त्यांनी काम करण्याचा निर्णय घेतला आहे. मी त्यांचे मनापासून स्वागत करतो. त्यांना खूप खूप शुभेच्छा देतो. 2022 ला देखील बाळासाहेबांची शिवसेना, त्यांचा विचार पुढे नेण्याचा निर्णय घेतला होता, 30 जून 2022 रोजी मी शपथ घेतली होती आणि आजही 30 जून आहे, हा योगायोग आहे. सुरुवातील मी आणि देवेंद्र फडणवीस आम्ही टीम म्हणून काम केले. पायाभूत सुविधांचा विकास केला. महाराष्ट्र जीडीपीमध्ये नंबर एक झाला आणि महाराष्ट्र वेगवान गतीने धावू लागला.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

## ढिंग-टांग




## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : वृक्षलागवडीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि नियोजनावर भर देण्याचे निर्देश

# ११ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी नियोजन करावे

**मुंबई (दै. संध्या)**

राज्यातील वृक्षलागवड मोहिमेला अधिक प्रभावी आणि शाश्वत स्वरूप देणे आवश्यक आहे. यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, खासगी-सार्वजनिक सहभाग (पीपीपी), ग्रामपंचायतींचे वृक्षलागवडीचे नियोजन आणि विविध विभागांचा समन्वय यावर भर देण्यात यावा. यंदा ११ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट असून योग्य नियोजन आणि सर्व यंत्रणांच्या सहभागातून हे उद्दिष्ट पूर्ण करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली हरित महाराष्ट्र आयोगाच्या वृक्षारोपण मोहिमेची आढावा बैठक झाली. यावेळी वन मंत्री गणेश नाईक, ‘मित्रा’चे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा मुख्यमंत्री फडणवीस यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रविण परदेशी, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, कृषी सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सूरज मांढरे, विश्वेसरैया इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्रा. आर. के. इंगळे, सेवानिवृत्त सनदी अधिकारी प्रमोद बोंगीरवार, यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, वन अधिकारी हे दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. यावेळी श्री.परदेशी यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात व्हि बी-जी राम जी योजनेअंतर्गत वृक्षलागवड वाढविण्यावर भर द्यावा. यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीने उपलब्ध जमिनीचे नियोजन करून ग्रामसभेच्या ठरावाद्वारे वृक्षलागवडीचा आराखडा तयार करावा आणि तो केंद्र सरकारच्या पोर्टलवर अपलोड करावा. हे काम वेळेत पूर्ण झाल्यास वृक्षलागवडीच्या खर्चापैकी काही निधी केंद्र शासनाकडून उपलब्ध होऊ शकतो.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी आणि वन अधिकारी यांनी समन्वयाने प्रत्येक गावाचा आराखडा तयार करून उद्दिष्टे निश्चित करावीत. प्रत्येक ग्रामपंचायतीने उपलब्ध जमिनीचा योग्य वापर करून नियोजनबद्ध वृक्षलागवड करावी, यासाठी जनजागृती मोहीमही राबविण्यात यावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

राज्यातील लागवडीसाठी आवश्यक जमीन ओळखून जीआयएस आधारित ‘लँड बँक’ तयार करण्यात आली असून ती जिल्हाधिकारी आणि संबंधित विभागांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. विभागनिहाय उद्दिष्टांचे नियमित पुनरावलोकन करावे. विभागीय आयुक्तांनी जिल्हानिहाय आढावा घेऊन नियमित अहवाल शासनाला सादर करावा, अशा सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या. पुढील वृक्षलागवड हंगामापूर्वी रोपांची पुरेशी उपलब्धता राहावी यासाठी खासगी संस्था, स्वयंसेवी संस्था आणि इतर भागीदारांच्या सहकार्याने नियोजन करण्यावर भर देण्यात यावा. कृषी विद्यापीठे आणि इतर संस्थांकडे उपलब्ध मोठ्या प्रमाणातील जमिनींचाही वृक्षलागवडीसाठी उपयोग करण्यात यावा. यामुळे शासन आणि खासगी क्षेत्राच्या संयुक्त प्रयत्नातून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड शक्य होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

वृक्ष लागवडीसाठी खासगी संस्थांचा सहभाग असलेल्या खासगी-सार्वजनिक भागीदारीचा (पीपीपी) आराखडा तयार करण्यात आला असून या आराखड्याच्या अंमलबजावणी साठी एकात्मिक कार्यपद्धती विकसित करण्यात आली आहे. ही कार्यपद्धती महापालिकांनाही देण्यात यावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले. वृक्ष लागवडीचे रिअल-टाईम मॉनिटरिंग करण्यासाठी उपग्रह तंत्रज्ञान, ड्रोनचा वापर आणि जीआयएस प्रणालीचा वापर करण्याची माहिती देण्यात आली. लागवड केलेल्या रोपांची वाढ आणि स्थिती सहा महिन्यांपर्यंत अचूकपणे तपासता येईल, अशी व्यवस्था विकसित करण्यात आली आहे. यासाठी महाराष्ट्र रिमोट सेंन्सर ॲप्लिकेशन सेंटरच्या माध्यमातून आवश्यक यंत्रणा उभारण्यात आली असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# अधिवेशन : निधीवरून सभागृहात रंगली चर्चा

**मुंबई (दै. संध्या)**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आज विविध महत्त्वाच्या विषयांवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी पाहायला मिळत आहे. अयोध्या राम मंदिरातील कथित दानपेटी गैरव्यवहार, शेतकरी कर्जमाफी, नगरविकास विभागातील कथित भ्रष्टाचार, महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न आणि कुंभमेळा प्राधिकरणासाठीच्या निधीवरून सभागृहात चर्चा रंगली असून विरोधकांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे.



राम मंदिरातील कथित दानपेटी गैरव्यवहाराच्या मुद्द्यावरून महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन करत "मंदिर रामभक्तांनी बांधलं, पण भाजपने दानपेटी लुटली" अशा घोषणा दिल्या. दरम्यान, विधान परिषदेच्या उपसभापतीपदाची निवडणूक संख्याबळ कमी असतानाही महाविकास आघाडी पूर्ण ताकदीने लढणार असल्याचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी स्पष्ट केले. तसेच शरद पवार, काँग्रेस आणि ठाकरे गट आगामी निवडणुकांमध्ये एकत्र राहतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

विधानसभेत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी शेतकरी कर्जमाफी, नगरविकास विभागातील कथित टीडीआर घोटाळे, स्मार्ट सिटी योजना आणि निधीच्या वापरावरून सरकारला धारेवर धरले. दुसरीकडे, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणासाठी ३४ हजार ७३२ कोटी रुपयांच्या विविध कामांची माहिती दिली, तर मंत्री शंभूराज देसाई यांनी महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी सरकार संवेदनशील असून मराठी भाषिकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याची ग्वाही सभागृहात दिली.

शरद पवारांचे नेतृत्व खूप मोठे आहे. ते काँग्रेस किंवा भाजपसोबत स्वतंत्रपणे जातील असे मला वाटत नाही. लोकसभा आणि आगामी विधानसभेत पवारांचा पक्ष, काँग्रेस आणि आम्ही एकत्रच आहोत, असे ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी म्हटले आहे. तर संजय राऊत यांच्या सल्ल्यांबाबत विचारले असता, राऊत हे शिवसेनेचे नेते असून ते इतर पक्षांना नाही तर केवळ शिवसैनिकांनाच सल्ला देतील. त्यांचा सल्ला ऐकून जर इतर पक्षांचे नेते काम करायला लागले तर आम्हाला चांगलेच वाटेल. अंबादास दानवे म्हणाले की, विधान परिषदेच्या उपसभापतीपदासाठी संख्याबळ कमी असले तरीही महाविकास आघाडी लोकशाहीच्या रक्षणासाठी ही निवडणूक पूर्ण ताकदीने लढणार असल्याचे स्पष्ट मत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी व्यक्त केले. ठाकरेंच्या शिवसेनेकडून मुंबई शिक्षक मतदारसंघाचे आमदार जगन्नाथ अभ्यंकर यांनी या पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावर बोलताना दानवे म्हणाले, आमचे संख्याबळ 14 ते 15 आमदारांचेच आहे, म्हणजेच ते खूप कमी आहे याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. मात्र, केवळ संख्याबळ कमी आहे म्हणून निवडणूक लढवायची नाही, असे होत नाही. लोकशाहीत प्रत्येक लढत महत्त्वाची असते.

राज्यातील शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेली कर्जमाफी ही निव्वळ 'बनवाबनवी' आणि 'फसवी' असल्याचा घणाघाती आरोप विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. मंगळवारी (३० जून) विधानभवनात माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीवरून आणि मग्रुरीवरून राज्य सरकारवर सडकून टीका केली. तसेच, याआधी काल (२९ जून) विधानसभेत बोलतानाही त्यांनी ३६ हजार कोटींच्या कर्जमाफीच्या दाव्यातील फोलपणा आणि जाचक अटींवरून सरकारला अक्षरशः धारेवर धरले होते.

# संपादकीय

# पासपोर्ट हा प्रवासाचा दस्तावेज, मग नागरिकत्व ठरते कसे?

परराष्ट्र मंत्रालयाच्या एका वरिष्ठाने पासपोर्ट सेवा दिवसानिमित्त केलेल्या एका वक्तव्याने देशभरात मोठी चर्चा सुरू झाली. त्यांनी म्हटले की, 'पासपोर्ट हा प्रवासासाठीचा दस्तऐवज आहे; तो नागरिकत्वाचा नाही.' सर्वसामान्य भारतीयांच्या दृष्टीने पासपोर्ट हा भारतीय नागरिकत्वाचा सर्वोच्च पुरावा मानला जातो. मग जर पासपोर्टच अंतिम पुरावा नसेल, तर भारतीय नागरिकत्व नेमके कशावर ठरते? भारतीय नागरिकत्व कोणत्याही एका ओळखपत्रावर नव्हे, तर भारतीय संविधान, नागरिकत्व कायदा, पारपत्र कायदा आणि सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयांच्या निर्णयांवर आधारित आहे. भारतीय नागरिकत्व म्हणजे व्यक्ती आणि राष्ट्र यांच्यातील कायदेशीर नाते होय. आधार, मतदार ओळखपत्र, पॅन किंवा पासपोर्ट ही प्रशासकीय सोयीसाठी दिलेली आहेत. त्यापैकी कोणताही एक दस्तऐवज स्वतःहून नागरिकत्व निश्चित करत नाही. भारतीय संविधानातील कलम ५ ते ११ मध्ये संविधान लागू झालेल्या २६ जानेवारी १९५० रोजी कोण भारतीय नागरिक मानला जाईल, हे नमुद आहे. यात पुढील बाबींचा समावेश आहे. संविधान लागू होताना नागरिकत्व, पाकिस्तानमधून आलेल्या स्थलांतरितांचे नागरिकत्व, परदेशात राहणाऱ्या भारतीय वंशाच्या व्यक्ती, परदेशी नागरिकत्व स्वीकारल्यास परिणाम, नागरिकत्वाची सातत्यता, नागरिकत्वाबाबत कायदा आणि जन्म, वंश परंपरा, नोंदणी, नागरिकीकरण तसेच भारतात नवीन प्रदेश समाविष्ट झाल्यास या पाच पद्धतींनी भारतीय नागरिकत्वाबाबतचे मार्ग सांगितले आहेत.

भारतात जन्म झाला म्हणजे प्रत्येकजण भारतीय नागरिक होतो, असा समज चुकीचा आहे. २६ जानेवारी १९५० ते ३० जून १९८७ या कालावधीत भारतात जन्मलेली व्यक्ती, पालकांचे नागरिकत्व काहीही असले, तरी भारतीय नागरिक मानली जाते. १ जुलै १९८७ ते २ डिसेंबर २००४ या कालावधीत जन्मलेल्या व्यक्तीच्या किमान एका पालकाकडे भारतीय नागरिकत्व असणे आवश्यक आहे. ३ डिसेंबर २००४ नंतर एका पालकाकडे भारतीय नागरिकत्व असणे आणि दुसरा पालक बेकायदेशीर स्थलांतरित नसणे आवश्यक आहे.

पासपोर्ट नागरिकत्वाचा अंतिम पुरावा का नाही, याचे उत्तर पासपोर्ट कायद्यात आहे. कलम ६ द्वारे पासपोर्ट देण्यापूर्वी अर्जदार भारतीय नागरिक आहे की नाही, याची पडताळणी केली जाते. परंतु, पासपोर्ट जारी झाला म्हणून तो नागरिकत्वाचे अंतिम प्रमाणपत्र ठरत नाही. कलम २० विशेष परिस्थितीत केंद्र सरकार गैर-नागरिकालाही पासपोर्ट जारी करू शकते. पासपोर्ट केंद्र सरकारची मालमत्ता आहे. सरकार तो जप्त किंवा रद्द करू शकते. आधार कार्ड हा केवळ ओळख आणि निवासाचा पुरावा आहे. तो नागरिकत्व सिद्ध करत नाही. पॅन कार्ड हा आयकर विभागाचा करसंबंधित क्रमांक आहे. अनेक विदेशी नागरिकांकडेही पॅन क्रमांक असतो. मतदार यादीत नाव असल्यामुळे नागरिकत्वाचा अंदाज येतो; परंतु न्यायालयीन वादात केवळ मतदार कार्ड अंतिम पुरावा ठरत नाही. जन्म दाखला हा जन्म झाल्याचा पुरावा आहे. परंतु, त्या जन्मामुळे नागरिकत्व मिळेल की नाही, हे त्या वेळच्या नागरिकत्व कायद्यावर अवलंबून असते. २०२० मध्ये केंद्र सरकारने लोकसभेत स्पष्ट सांगितले होते की, पासपोर्ट, आधार, मतदार कार्ड, पॅन कार्ड किंवा जन्म दाखला यापैकी कोणतेही एक नागरिकत्वाचा अंतिम पुरावा नाही. यासाठी साधारणपणे पुढील कागदपत्रांचा एकत्रित विचार केला जातो. - जन्म दाखला, पालकांचे नागरिकत्व, शालेय दाखले, जुनी मतदार यादी, जमीन महसूल नोंदी, शासकीय सेवा नोंदी, नोंदणी किंवा नागरिकीकरणाचे प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र (विशिष्ट परिस्थितीत). म्हणजेच एकाच कागदपत्रावर नव्हे तर उपलब्ध पुराव्यांच्या एकत्रित मूल्यमापनावर नागरिकत्व ठरते. सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांनीही यासंदर्भात काही महत्त्वाचे निवाडे दिले आहेत.

## संस्कृत सुभाषित

एकं वस्तु द्विधा कर्तुं बहव: सान्तिधान्विन:।
धन्वी स मार एवैको द्वयोरैक्यं करोतिय:।।
एका वस्तूचे दोन तुकडे करणारे धनुर्धारी अनेक असतात पण दोन व्यक्तींना एकरूप करणारा धनुर्धारी कामदेव हा एकमेव आहे.

## गुरु वचन

### गुण हीच महानता असते

एका दिवशी एक पंडित शास्त्रार्थ करण्यासाठी स्वामी दयानंद यांच्याकडे गेला. त्यावेळी स्वामी दयानंद जमीनीवर बसून काहीतरी लिखाण करत होते. त्यांनी त्या पंडिताला आपल्याजवळ एका आसनावर बसण्यास सांगितले. त्या पंडिताला आपल्या विद्वतेचा अभिमान होता. यामुळे ते स्वामी दयानंद यांना कमी समजत असत. यामुळे स्वामी दयानंद यांनी त्याला जमीनीवर आपल्या जवळ असलेल्या आसनावर बसण्यास सांगितले. तेव्हा त्या पंडितास ही गोष्ट त्याचा अपमान असल्याचे वाटले. त्यांना वाटले ते तर सर्वश्रेष्ठ आहेत. यासाठी त्यांना स्वामी दयानंद यांच्यापेक्षा उंच आसन मिळायला पाहिजे. अशातच ते खाली आसनावर बसून आपला स्तर कसे कमी करु शकतात. असा विचार करुन ते उभेच राहिले.

स्वामी दयानंद यांनी पंडितांच्या मनातील अवस्था चांगल्याप्रकारे ओळखली. ते पंडीतजीला म्हणाले की, उंच आसनावर बसल्यास कोणी महान होत नाही. जर असे होऊ शकत असेल तर उंच झाडावर बसलेला कावळा सर्वाधिक पुजनीय आणि महान असता. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, स्वामी दयानंद पंडीतजीशी बोलत असताना समोर एका झाडावर एक कावळा बसला होता. त्या कावळ्याकडे संकेत करत स्वामी दयानंद पंडित यांच्याशी पुन्हा बोलले महानता तर त्याग, परोपकार आणि विनम्रतासारख्या गुणांमुळे सिद्ध होते. कोणताही व्यक्ती त्याच्या गुणाने महान समजला जातो. उंच आसानावर बसल्यामुळे नाही. जर आपल्यामध्ये गुण असतील तर आपण खालच्या जागेवर बसूनही तेवढेच विद्वान असतो आणि जर गुणांचा अभाव असेल तर उंच ठिकाणी बसूनही वाईट समजले जाते. स्वामी दयानंद यांची ही गोष्ट ऐकून पंडीजींचे डोळे उघडले आणि त्यांनी स्वामीजवळ असलेले आसन ग्रहण केले.

## उपदेशकथा

### महापुरे झाडे जाती

एका घनदाट जंगलात खळखळ वाहणाऱ्या नदीच्या किनाऱ्यावर एक विशाल वटवृक्ष होता व दुसऱ्या किनाऱ्यावर एक वेळूचे झाड होते. ते अगदीच पातळ व लवचिक होते. वटवृक्षाच्या आपल्या विशालतेचा गर्व होता. तो वेळूच्या झाडाला म्हणाला, तुझे जीवन निरर्थक आहे. तुझ्या पातळपणामुळे तू कोणालाही सावली देऊ शकत नाहीत. फळे, फुले नसल्याने पशुपक्षीही तुझ्याजवळ येत नाहीत. याउलट माझी सावली, फळे, फुले यांचा सर्वांना उपयोग होतो. वेताच्या झाडाने जाणले की, वटवृक्षाला त्याच्या विशालतेचा गर्व झाला आहे पण तो गप्प बसला. काही दिवसांनी वादळ आले. घनघोर पाऊस पडू लागला. वादळाच्या वेगाने व पाण्याच्या रेट्याने वडाचे झाड उन्मळून पडले पण वेताचे झाड पाण्याच्या व वादळाच्या वेगाच्या दिशेने वाकल्यामळे जसेच्या तसे राहिले. वादळ शांत झाले. पाणी वाहून गेले पण वेताचे झाड पूर्वीप्रमाणेच उभे होते व वटवृक्षाचे नामोनिशाणही नव्हते.

कथा उपदेश : विनयाचा अंतिम विजय होतो. गर्वाचे घर खाली होते.

## पंचांग

| पंचांग | नक्षत्र:पूर्वाषाढा |
|---|---|
| १ जुलै २०२६ | ०६:५१:०३ |
| बुधवार | योग:ऐन्द्र १६:०३:४७ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:कौलव ०७:३८:२६ |
| निज ज्येष्ठशके | करण:तैतिल २०:४०:०७ |
| संवत्– १९४८ | सूर्य:मिथुन |
| संवत्सर –पराभवनाम | चन्द्र:मकर१३:३१:२० |
| अयन– दक्षिणयन | हिजरी सन् – १४४८ |
| मास– निज ज्येष्ठ | मुस्लिम मास – मोहरम |
| ऋतु– सौर वर्षा | तारीख – १५ |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:प्रतिपदा ०७:३८:२६ | वसंतराव नाईक जयंती |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९९७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 6 | | | 2 | | 3 | 7 |
| | | | 9 | | | | 8 | 2 |
| 1 | 8 | | | | | 6 | 9 | 4 |
| | | 5 | | 9 | | 2 | | 3 |
| | | | 6 | | 3 | | | |
| 6 | | 3 | | 7 | | 8 | | |
| 4 | 5 | 8 | | | | | 2 | 1 |
| 3 | 6 | | | | 1 | | | |
| 2 | 1 | | 3 | | | 9 | | |

**: सूडोकु :**

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९९६ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 3 | 7 | 2 | 1 | 8 | 6 | 5 | 4 |
| 2 | 8 | 5 | 6 | 9 | 4 | 1 | 7 | 3 |
| 4 | 6 | 1 | 7 | 3 | 5 | 8 | 9 | 2 |
| 8 | 9 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 2 | 1 |
| 1 | 4 | 2 | 8 | 7 | 3 | 9 | 6 | 5 |
| 5 | 7 | 6 | 1 | 2 | 9 | 3 | 4 | 8 |
| 3 | 5 | 8 | 9 | 4 | 7 | 2 | 1 | 6 |
| 7 | 1 | 4 | 3 | 6 | 2 | 5 | 8 | 9 |
| 6 | 2 | 9 | 5 | 8 | 1 | 4 | 3 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९२१ – कम्युनिस्ट पार्टी ऑफ चायना या पक्षाची स्थापना झाली.
- १९४८ – कायदे आजम मोहम्मद अली जिन्ना यांनी पाकिस्तानचा सेंट्रल बँक, स्टेट बँक ऑफ पाकिस्तानचे उद्घाटन केले.
- २००८ – इराण मधील एका न्यायालयाने इस्त्रायलच्या एका गुप्तहेराला मृत्युदंडाची शिक्षा सुनावली.

### राष्ट्रीय

- १९४७ – १५ ऑगस्टला भारताला स्वतंत्र मिळेल या ॲक्टला ब्रिटीश संसदेने मंजूरी दिली.
- २००६ – गुजरातमधील पोटाच्या विशेष न्यायालयाने अक्षरधाम मंदिरवरील हल्ल्यातील तिन जणांना फाशी तर दोंन जणांना दहा वर्षाची शिक्षा ठोठावण्यात आली.

### जन्म

- १९१३ – वसंतराव नाईक, हरितक्रांतीचे आणि रोजगार हमी योजनेचे जनक, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री.
- १९३८ – पंडित हरिप्रसाद चौरासिया, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे बासरीवादक.
- १९६१– कल्पना चावला, भारतीय–अमेरिकी अंतराळवीर.

### निधन

- ०८६८ – अली अल हादी, शिया इमाम.
- १९७१ – सर विल्यम लॉरेन्स ब्रॅग, ऑस्ट्रेलियन ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेता.
- १९९४ – राजाभाऊ नातू, मराठी रंगभूमीवरील नेपथ्यकार.

स्वतंत्र्य दिन – सोमालिया,रवांडा,बुरुंडी

## : SMS :

Once A Pig Fell in Love with a Chicken. They both kissed each other. Next day Pig died of Bird Flu and Chicken died of Swine Flu. AJAB PREM KI GHAZAB KAHANI.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३४ | २४.६ |
| अहमदनगर | ३३.२ | २४.३ |
| अकोला | ३९.४ | २६.८ |
| अमरावती | ३९.९ | २६.२ |
| बीड | ४३ | ३०.३ |
| भंडारा | ४२.२ | २७.४ |
| बुलढाणा | ५० | ३४.५ |
| चंद्रपूर | ४२.८ | ३१.३ |
| चेन्नई | ४१.५ | ३१.४ |
| नवी दिल्ली | ४६.८ | ३९.६ |
| धुळे | ३८.४ | २७.५ |
| गोंदिया | ४१.८ | २६.९ |
| जळगाव | ३९.१ | २६.५ |
| कोल्हापूर | २७.३ | २३.८ |
| लातूर | ३३.७ | २५ |
| मुंबई | ३४.६ | ३२ |
| नागपूर | ४१.९ | २७.२ |
| नांदेड | ३८.८ | २६.९ |
| नंदूरबार | ३५.६ | २६.४ |
| नाशिक | ३१.१ | २४.६ |
| पुणे | २९.५ | २३.३ |
| पंढरपूर | ३५.५ | २५.५ |
| सातारा | ३२.१ | २४.६ |
| सांगली | ३१.५ | २४.३ |
| सोलापूर | ३५ | २५.६ |
| वर्धा | ४२.४ | २७.१ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** महत्वाचे निर्णय घेण्यास व्यवसायातील महत्वाचे करार–मदार करण्यास आजचा दिवस चांगला आहे.

**तुळ :** हाताखालील कर्मचाऱ्यांचे उत्तम सहकार्य लाभेल. काहींची अध्यात्मिक प्रवृत्ती वाढीस लागेल.

**वृषभ :** संततीसौख्य लाभेल. मुलामुलींसंदर्भात एखादी भाग्यकारक घटना घडेल. त्यांचे काही प्रश्न असल्यास ते मार्गी लावाल.

**वृश्चिक :** वाहने सावकाश व जपून चालवावीत. तुमची चीडचीड होणार आहे. आरोग्याच्या थोड्याफार तक्रारी जाणवतील.

**मिथुन :** आर्थिक लाभाचेदृष्टीने एखादी नवी योजना नजरेसमोर येईल. व्यवसायात नवीन कल्पना अंमलात आणू शकाल. दिवस फारसा अनुकूल नाही.

**धनु :** नातेवाईकांशी मतभेदाची शक्यता आहे. मानसिक अस्वास्थता जाणवेल. प्रकृतीकडे लक्ष द्यावयास हवे. प्रवास शक्यतो टाळावेत.

**कर्क :** तरीही जिद्दीच्या जोरावर तुम्ही तुमची आजची कामे पार पाडू शकाल. वाहने जपून व सावधानतेने चालवावीत. प्रवास टाळावेत.

**मकर :** नवीन हितसंबंध निर्माण होतील. अपेक्षित गाठीभेटी पडतील. सध्या आपणाला नातेवाईकांचे सहकार्य मिळणार नाही, हे गृहितच धरावयास हवे.


**सिंह :** महत्वाचे निर्णय नकोत. काहींची अध्यात्मिक प्रगती होईल. आज तुम्हाला महत्वाच्या आर्थिक कामांत पत्नीचा सल्ला उपयोगी ठरणार आहे.

**कुंभ :** आज पूर्ण दिवस तुम्ही उत्साहाने व उमेदीने कार्यरत राहणार आहात. आरोग्य उत्तम राहील. व्यवसायात नवीन बाजारपेठ मिळवू शकाल.

**कन्या :** वैवाहिक सौख्य उत्तम लाभेल. मित्रांचे सहकार्य उत्तम लाभेल. अपेक्षित गाठीभेटी पडतील. उत्साह व उमेद वाढेल. प्रवास सुखकर होतील.

**मीन :** नोकरी–व्यवसायात उत्तम महत्वाचे निर्णय घेण्यास तसेच आगामी काळाचे नियोजनास दिवस अनुकूल आहे.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९९७



**आडवे शब्द**

१. संगीतातील सात स्वर
५. दोन पवित्र नद्यांचे नावे
७. विद्या
९. अरण्य
११. ढगाळ वातावरण
१२. चांदी
१३. वस्तू तयार करण्यासाठी लागणारे साहित्य, मालमसाला
१५. युक्ती
१७. फुरसत
१८. आपला नसलेला
२०. अद्भूत, विचित्र
२३. पार्वतीचे एक नाव
२५. कारखान्याचा मालक
२७. उपहास, टिंगल
२८. जेव्हा
३०. घागरा
३२. नेहमी, सदोदित
३३. बांबू
३४. जन्म
३५. देवाण–घेवाण
३७. चुणीदार पट्टी
३८. सुंदर तरुणी
४०. झाडाभोवतीचा कट्टा
४१. ललाट
४३. तुलनेतील साखरेपणा
४४. आनंद
४५. युद्ध
४८. कापड तयार करणाऱ्या कारखान्यातील कामगार
४९. उन्हाळ्यातील त्वचा दुभंगण्याचा रोग
५१. शृंखला, कडी
५२. हडळ, स्त्रीभूत
५४. मातीचा कण
५५. मुलीचा नवरा
५८. उष्टे
६१. घाईघाईत, धावत
६४. हिंदीत चुकीचे
६५. गुजराथी नृत्यप्रकार
६७. लक्ष्मीचे एक नाव
६९. मातृभाषा
७०. लोणी
७१. घरात शिरकाव करणारा सगळ्यात धोकादायक कीटक
७२. त्याप्रमाणे, तसे

**उभे शब्द**

१. 'काही विशेष नसलेला' किंवा 'सरासरी' या अर्थाने वापरला जाणारा शब्द
२. तृण
३. अंत:करण
४. धकधक
६. जाणूनबुजून
७. घागर
८. फायदा
१०. राष्ट्रभाषते शेतकरी
११. स्वत:ला
१३. व्याजाने कर्ज देणारा
१४. उन्हाळा ऋतू
१६. दावा
१७. मंत्रीमंडळ
१९. घराणे
२०. टाळता न येणारे
२१. तफावत
२२. नेत्रसुखद
२३. मेहरबानी
२४. ठोक! हाण
२६. संसद सदस्य
२९. धर्मार्थ देणे
३१. गोष्ट, कथा
३३. सोने
३४. मैफिल
३५. पायपासून डोक्यापर्यंत
३६. पहिला
३९. सुसर
४२. मर्यादा
४४. संधी
४५. रंग बदलणारा प्राणी
४६. रात्र
४७. पंक्ती, गाण्याचे चरण
४८. पर्वतकन्या– पार्वतीचे एक नाव
५०. दालचिनी
५१. समुद्र, रत्नाकर
५३. नशीब (हिंदी)
५६. नवरदेवाची आई
५७. प्राणवायूचा अखंड पुरवठा करणारी वनस्पती
५८. नासाडी, नाश (हिंदी)
५९. व्यायाम
६०. रानटी
६१. ऱ्हास, पाडाव
६२. मोठी उथळ ताट
६३. मजबूत, भरभक्कम
६६. फळांतील द्रव
६८. कळस, शेंडा

उत्तर उद्याच्या अंकात

**जम्बो शब्दकोडे क्र. ९९६ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.राखी ५.झाडपाला ८.अपमान ११.मजलदरम जल १५.चाचा १६.नथ १७.सरकार १८.वरदान २१.क्षालन २३.घर २४.भसकापुरी २६.वसवस २८.नाग ३०.धामण ३१.लत ३३.हाट ३४.कारभार ३५.चमकी ३७.कानन ३९.पापा ४१.तरळ ४३.नाट ४४.करतल ४५.तबकडी ४७.महिला ४९.सडपातळ ५१.कार्यक्रम ५३.समजावणे ५५.रमा ५६.सांब ५७.सार ५८.गळ ६०.समज ६१.विशाल ६३.घळ ६४.जग ६५.वात ६७.पराक्रम ६८.राम ६९.खबरदार ७०.तड ७१.म ाजघर ७३.गंडा ७४.कंसमामा ७५.हत्तीच्या पायी देणे ७८.कोपला ७९.टणत्कार

उभे उत्तर : १.रामरक्षा २.खीज ३.मंद ४.अमर ५.झालर ६.पाचावर धारण बसणे ७.लाचार ८.अननस ९.पथ १०.नस १२.लहानसहान १३.रसकस १४.जकातनाका १९.दाभण २०.आपुलकी २२.लव २५.रीत २७.वट २९.गरज ३२.रकाना ३५.चर ३६.मळमळ ३८.नटवर्य ३९.पार ४०.पातळसर ४१.तडीपार ४२.ओलाचिंब ४४.कलम ४६.कड ४८.अजागळ ५०.तमासगीर ५१.काटा ५२.क्रयविक्रय ५४.वळ ५६.सांजवात ५७.साल ५९.अगरबत्ती ६२.शाम ६३.घमघमाट ६४.जब ६६.तडकणे ६७.परागंदा ६८.राजमा ७१.मासला ७२.पायी ७४.कंप ७५.हर ७६.पाय ७७.देणे

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## ईशरे पुणे चॅप्टरतर्फे "वर्ल्ड रेफ्रिजरेशन डे" व "रेफटेक-6" उत्साहात संपन्न

पुणे (दैनिक संध्या) : ईशरे (इंडियन सोसायटी ऑफ हीटिंग, रेफ्रिजरेटिंग अँड एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स) पुणे चॅप्टरतर्फे जागतिक रेफ्रिजरेशन दिनानिमित्त "रेफटेक-६" हा तांत्रिक कार्यक्रम हॉटेल टिप टॉप इंटरनॅशनल, वाकड येथे उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमास ईशरे पुणे चॅप्टरचे अध्यक्ष सुभाष खनाडे, रेफटेक सिरीज संयोजक महेश मोरे, माजी अध्यक्ष दिपक वाणी, वीरेंद्र बोराडे, चेतन ठाकूर, अमित गुलवाडे, ब्लू स्टारचे डॉ. कुंदन कुमार, आयआयटी मुंबईचे प्रा. डॉ. मिलिंद राणे, तसेच अनेक सभासद उपस्थित होते. सुभाष खनाडे यांनी ईशरे पुणेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी ईशरेचे संस्थापक अध्यक्ष अरविंद सुरंगे यांनी अमेरिकेतून पाठविलेल्या शुभेच्छा संदेशात नोव्हेंबर २०२६ मध्ये पुण्यात प्रथमच होणाऱ्या 'रेफकोल्ड -२०२६' या आंतरराष्ट्रीय परिषदेची माहिती दिली. डॉ. कुंदन कुमार यांनी औद्योगिक हीट पंप हे ऊर्जा कार्यक्षम व पर्यावरणपूरक तंत्रज्ञान असून उद्योगांमध्ये ऊर्जा बचत व कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी त्यांचे महत्त्व अधोरेखित केले. प्रा. मिलिंद राणे यांनी हीट पंप तंत्रज्ञानामुळे कमी वीज वापरून अधिक उष्णता व कूलिंग मिळत असल्याने शाश्वत विकासाला मोठी चालना मिळत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षा चिंचोरे यांनी केले.

## 'प्राचीन शास्त्रे किती खरी' यावर शनिवारी रंगणार वादसभा

■ पांडुरंग बलकवडे, आशुतोष बापट यांना पुरस्कार

■ प्रसाद प्रकाशनतर्फे ४ जुलै रोजी वादसभा, पुरस्कार वितरण व ग्रंथ प्रकाशन

पुणे (दैनिक संध्या) : भारतीय परंपरेत प्राचीन काळापासून विविध विषयांवर शास्त्रार्थ आणि वादसंवादाची समृद्ध परंपरा राहिली आहे. ज्ञानाची चिकित्सा, विविध मतप्रवाहांचा अभ्यास आणि सत्याचा शोध या उद्देशाने आयोजित केल्या जाणाऱ्या अशा वादसभांनी भारतीय वैचारिक परंपरा अधिक समृद्ध केली. याच परंपरेचा जागर करत प्रसाद प्रकाशन आणि विज्ञान भारती यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, ४ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता एस. एम. जोशी सभागृह, गांजेवे चौक, पुणे येथे पुरस्कार विशेष वादसभेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी पुरस्कार वितरण, ग्रंथ प्रकाशन देखील होणार आहे अशी माहिती प्रसाद प्रकाशनच्या संचालिका डॉ. उमा बोडस यांनी दिली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ प्रा. प्र. के. घाणेकर हे असणार आहेत. माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर आणि राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे विचारक राजेश पांडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ पांडुरंग बलकवडे आणि भारतीय विद्या तज्ज्ञ आशुतोष बापट यांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण असलेल्या वादसभेचा विषय 'प्राचीन शास्त्रे किती खरी' असा आहे. या वादसभेच्या न्यायाध्यक्षपदी डॉ. नितीन करमळकर असतील. वादसभेत डॉ. माधवी गोडबोले, डॉ. मनीषा पुराणिक, डॉ. मनीष वाळवेकर, डॉ. अंबरीष खरे, श्री. रमेश दाते आणि डॉ. दीप्ती सिधये हे सहभागी होऊन विषयाच्या विविध पैलूंवर आपली मते मांडणार आहेत. याशिवाय प्रसाद प्रकाशन आणि अनाहत प्रकाशन यांच्या विविध पुस्तकांचे प्रकाशनही या कार्यक्रमात होणार आहे. प्रलय कथा, प्राचीन भारतीय भौतिकशास्त्र, भारताचे राजवैभव, देव जसा आहे आहे तसा का आहे, कुंभमेळा, नाती, आनंदाची मोळी यांसह विविध ग्रंथांचे प्रकाशन या वेळी करण्यात येणार आहे.



## "बेबी डू डाय डू" मध्ये अँग्री यंग वुमन दिसणार हुमा कुरेशी

पुणे (दैनिक संध्या) : चित्रपटांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून स्त्री एक कमकुवत पात्र दाखवले जाते. स्त्रीला वाचवण्यासाठी सुद्धा शेवटी एक पुरुष येतो आणि खलनायकापासून त्या स्त्रीची सुटका करतो. अशा पारंपारिक भूमिकेपेक्षा मला वेगळी भूमिका पडद्यावर साकारायची होती. "बेबी डू डाय डू" च्या निमित्ताने मला ही संधी मिळाली. आपल्याला अनेक वर्षांपासून पडद्यावर अँग्री यंग मॅन पाहण्याची सवय आहे, परंतु बेबी डू डाय डू चित्रपटांमध्ये प्रथमच तुम्ही अँग्री यंग वुमन पहाल असे प्रसिद्ध अभिनेत्री हुमा कुरेशी यांनी सांगितले. सलीम सिबलिंग आणि पुणे 04 पिक्चर यांनी निर्मिती केलेला हुमा कुरेशी यांची प्रमुख भूमिका असलेला बेबी डू डाय डू हा हिंदी चित्रपट येत्या 3 जुलै रोजी प्रदर्शित होत आहे या निमित्ताने पुण्यातील औंध येथील वेस्टएंड मॉल येथे हुमा कुरेशी, चित्रपटाचे दिग्दर्शक नचिकेत सामंत, अभिनेता रचित सिंग आणि मरुधर शेखावत यांनी भेट दिली. त्यादरम्यान त्यांनी चित्रपट संदर्भात प्रेक्षकांशी गप्पा मारल्या. हुमा कुरेशी म्हणाल्या, बेबी डू डाय डू हा चित्रपट आमच्यासाठी आव्हान आहे. हा चित्रपट तयार करण्यासाठी कोणताही मोठा स्टुडिओ अथवा निर्माता आमच्या पाठीशी नाही. आम्ही पूर्णतः प्रेक्षकांच्या पाठिंबावर आणि प्रेमावरच हा चित्रपट तयार केला आहे त्यामुळे आम्हाला प्रेक्षकांचा निश्चितच प्रतिसाद मिळेल अशी मला आशा आहे.

## जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसमध्ये क्रीडा कोट्यातून मोफत प्रवेश प्रक्रिया

■ राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना १०० टक्क्यांपर्यंत शिष्यवृत्तीची संधी

पुणे (दैनिक संध्या) : नऱ्हे येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसतर्फे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी क्रीडा कोट्यातून प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. केजी पासून पीएचडी पर्यंतच्या विविध अभ्यासक्रमांसाठी राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व केलेल्या गुणवंत खेळाडूंना मोफत प्रवेश दिला जाणार आहे. क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना संस्थेतर्फे मोफत प्रवेश, १०० टक्क्यांपर्यंत क्रीडा शिष्यवृत्ती, मोफत आहार सुविधा, क्रीडा साहित्य तसेच महाविद्यालयाच्या अत्याधुनिक क्रीडा पायाभूत सुविधांचा लाभ देखील विद्यार्थ्यांना घेता येणार आहे. संस्थेचे उपाध्यक्ष अ‍ॅड. शार्दुल जाधवर म्हणाले, नऱ्हे येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच क्रीडा क्षेत्रालाही प्राधान्य दिले असून, क्रीडा क्षेत्रात करिअर घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना महत्त्वपूर्ण ठरणार आहे. क्रीडा क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# 'शॅडो ऑफ द सर्पेंट फोर्ट : ३२४ बीसीई' : साहसकथेचे प्रकाशन उत्साहात

पुणे (दै. संध्या)

लेखिका आरती चव्हाण यांच्या फॉर्गोटन किंग्डम्स ऑफ इंडिया या मालिकेतील पहिल्या कादंबरीचे शॅडो ऑफ द सर्पेंट फोर्ट : ३२४ बीसीई या पुस्तकाचे प्रकाशन आपटे रस्त्यावरील श्रुती मंगल सभागृहात उत्साहात पार पडले. प्राचीन भारतीय इतिहास, संशोधन आणि ऐतिहासिक काल्पनिक साहित्य यांवर झालेल्या विशेष चर्चासत्राने कार्यक्रमाची रंगत आणखी वाढवली.



या चर्चासत्राचे सूत्रसंचालन ज्येष्ठ पत्रकार आणि लेखिका सुनंदा मेहता यांनी केले. चर्चासत्रात दक्षिण आशियाई धर्म आणि संस्कृतचे अभ्यासक हेमंत राजोपाध्ये, ऑक्सफर्ड स्कॉलर व पर्शियन भाषांचे संशोधक डॉ. सुमित पॉल, विश्वकर्मा पब्लिकेशन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकाशक विशाल सोनी तसेच लेखिका आरती चव्हाण सहभागी झाले.

यावेळी बोलताना डॉ. सुमित पॉल म्हणाले की, इतिहास हा वस्तुनिष्ठपणे समजून घेतला पाहिजे. त्याचे विविध अर्थ लावले जाऊ शकतात; मात्र इतिहासाचे विकृतीकरण किंवा फेरफार होता कामा नये. अनेक ऐतिहासिक कालखंडांबाबत उपलब्ध नोंदी अपुऱ्या असल्याने संशोधक आणि लेखकांना उपलब्ध पुराव्यांच्या आधारे अभ्यास करून त्या काळाचे वास्तव उभे करावे लागते.

लेखिका आरती चव्हाण यांनी सांगितले की, ऐतिहासिक कादंबरी लिहिताना संशोधन आणि कल्पनाशक्ती यांचा समतोल राखणे अत्यंत महत्त्वाचे असते. काल्पनिक पात्रे आणि प्रसंग निर्माण करता येतात; मात्र ते त्या काळाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक संदर्भांशी सुसंगत असणे आवश्यक असते.

त्या पुढे म्हणाल्या की, माझ्या मुलांना ग्रीक पुराणकथांबद्दल आकर्षण निर्माण झाल्यानंतर भारतीय इतिहासातील तितक्याच रोमांचकारी कथा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. त्यातूनच इ.स.पूर्व ३२४ या कालखंडाच्या पार्श्वभूमीवर आधारित शॅडो ऑफ द सर्पेंट फोर्ट या कादंबरीची निर्मिती झाली. ही केवळ ऐतिहासिक कादंबरी नसून साहस, रहस्य आणि अलौकिक घटकांची सांगड घालणारी कथा आहे.

प्रकाशक विशाल सोनी यांनी भारतीय इतिहासावर आधारित दर्जेदार साहित्य वाचकांपर्यंत पोहोचवण्याच्या गरजेवर भर देत अशा विषयांवरील साहित्याला वाढता प्रतिसाद मिळत असल्याचे सांगितले. कार्यक्रमास इतिहासप्रेमी, साहित्यप्रेमी, वाचक आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्रात स्वतंत्र लोककला विद्यापीठ स्थापन करण्याची गरज - अविनाश आवलगावकर

पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्रामध्ये शेकडो लोककला आणि हजारो लोककलावंत आहेत. जे लोक कलावंत गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्राची लोककला संस्कृती आणि परंपरा एका पिढीपासून पुढील पिढीपर्यंत नेत आहेत. लोककला केवळ एक कला नाही तर ती महाराष्ट्राची ओळख आहे. या लोककलांचा शास्त्रीय दृष्ट्या सखोल अभ्यास होण्यासाठी महाराष्ट्रामध्ये स्वतंत्र लोककला विद्यापीठ स्थापन करण्याची गरज आहे असे मत मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू अविनाश आवलगावकर यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य विभाग आणि समरसता साहित्य परिषदेतर्फे पुण्यातील बालगंधर्व रंग मंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या समरसता लोककला संमेलनाच्या समारोप प्रसंगी अविनाश आवलगावकर बोलत होते. प्रसन्न पाटील, धनंजय खुडे, निलेश गद्रे आदी यावेळी उपस्थित होते अविनाश



आवलगावकर म्हणाले, लोककला आणि ही लोककला सादर करणारे लोककलावंत हा महाराष्ट्राचा ठेवा आहे. परंतु दुर्दैवाने महाराष्ट्रातील हजारो लोककलावंतांची आर्थिक परिस्थिती बेताची आहे. या लोककलावंतांना खऱ्या अर्थाने लोकाश्रया बरोबरच राजा श्रेयाची गरज आहे. समरसता लोककला संमेलना सारखी संमेलने केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर भारताच्या विविध भागांमध्ये दरवर्षी आयोजित करणे गरजेचे आहे, त्यामुळे भारताच्या विविध भागांमध्ये असलेल्या लोककलावंतांना व्यासपीठ मिळू शकेल आणि त्यांची कला जगासमोर येऊ शकेल. शासनाने लोककलावंतांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रथमतः लोककलावंतांनी एकत्र येण्याची गरज आहे.

## विद्यार्थीदशेत झोपू न देणारी स्वप्ने बाळगा : डॉ. अनिल दुधभाते

### दुधभाते ऑप्टोमेट्री कॉलेज व आदित्य फाउंडेशनतर्फे बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

पुणे (दै. संध्या)

दुधभाते ऑप्टोमेट्री कॉलेज आणि आदित्य फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यार्थीदशेत मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी झपाटून परिश्रम करण्याची प्रेरणा यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मिटकॉन कंपनीचे संचालक डॉ. गणेश खामगळ होते. बन्सल क्लासेस, पुणेचे संचालक अभिषेक अवचार आणि प्रसिद्ध लेखिका प्रियंका चौधरी या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. दुधभाते ऑप्टोमेट्री कॉलेजचे प्राचार्य डॉ. अनिल दुधभाते यांच्या हस्ते सर्व मान्यवरांचा शाल व डॉ. दुधभाते लिखित 'नेत्रकोष' हे पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. स्नेहल मानपुत्र यांनी प्रास्ताविक केले, तर



सूत्रसंचालन महाविद्यालयाची विद्यार्थिनी श्रेया महामुनी हिने केले.

यावेळी अभिषेक अवचार आणि लेखिका प्रियंका चौधरी यांनी विद्यार्थ्यांना करिअर, ध्येय आणि यश याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना डॉ. अनिल दुधभाते म्हणाले, "आपण झोपेत पाहतो ती स्वप्ने नसतात, तर जी स्वप्ने आपल्याला झोपू देत नाहीत, तीच खरी स्वप्ने असतात. ती पूर्ण करण्यासाठी झपाटून काम करा."

महाविद्यालयाच्या प्राध्यापिका काजोल माणिकपूरी यांनी सादरीकरणाद्वारे ऑप्टोमेट्री अभ्यासक्रम, त्यातील करिअरच्या संधी आणि या क्षेत्रातील उज्ज्वल भवितव्याची माहिती दिली. महाविद्यालयाची विद्यार्थिनी प्राजक्ता हिने दुधभाते ऑप्टोमेट्री कॉलेजमधील दर्जेदार शिक्षण, अनुभवी प्राध्यापक आणि आधुनिक सुविधांबाबतचा अनुभव उपस्थितांसमोर मांडला.

त्यानंतर बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ, प्रमाणपत्र आणि 'नेत्रकोष' हे पुस्तक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

अध्यक्षीय समारोपात डॉ. गणेश खामगळ यांनी विद्यार्थ्यांना यशाचा मंत्र देताना सांगितले, "तुम्हाला जे आवडते ते प्रथम कागदावर लिहा. ते वारंवार वाचा, मनात रुजवा आणि त्यानुसार कृती करा. सातत्यपूर्ण प्रयत्नांतूनच ध्येय गाठता येते." त्यांच्या मार्गदर्शनाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

या कार्यक्रमास डॉ. डिंपल दुधभाते, डॉ. वैशाली गोसावी, डॉ. शशांक घावटे, डॉ. गणेश दुधभाते, डॉ. विकास क्षीरसागर, डॉ. वैशाली गोमसाळे, प्रियंका एडके, गणेश मोटे, साहित्यिक गिरीश वसेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. स्नेहल मानपुत्र, शीतल हिरळकर, गौरी निमकर, कोमल भोसले तसेच दुधभाते नेत्रालयाच्या संपूर्ण कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. आभारप्रदर्शनानंतर स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## महात्मा फुले वाड्यामध्ये उत्साहपूर्ण वातावरणात वटपौर्णिमा पूजन !



पुणे (दै. संध्या)

पुण्यातील ऐतिहासिक महात्मा फुले वाडा येथे यंदाची वटपौर्णिमा अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. पुरातत्व विभागाने वटवृक्ष पूजनावर घातलेली बंदी हिंदूंच्या संघटित प्रयत्नांमुळे प्रशासनाला मागे घ्यावी लागली, हिंदूंच्या संघटित शक्तीच्या विजयामुळे हा कार्यक्रम मोठ्या दिमाखात पार पडला. पुरातत्व विभागाने फुले वाड्यातील पारंपारिक वटपूजनावर बंदी घालणारा आदेश काढला होता. या निर्णयाविरुद्ध हिंदु जनजागृती समिती, राष्ट्रभक्त अधिवक्ता समिती, रणरागिणी शाखा, विश्व हिंदु परिषद, दुर्गा वाहिनी आणि स्थानिक महिला यांनी तीव्र लढा दिला. या सर्वांच्या संघटित प्रयत्नांमुळे अखेर प्रशासनाला नमते घ्यावे लागले आणि ही बंदी उठवण्यात आली.

या कार्यक्रमात भारतीय जनता पक्षाच्या राज्यसभा खासदार प्रा. डॉ. सौ. मेधा कुलकर्णी याही सहभागी झाल्या आणि त्यांनीही वटपूजन केले. वटपौर्णिमा हा केवळ सण नसून तो निसर्ग संवर्धनाचा वैज्ञानिक संदेश देणारा सण आहे, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. मुला-मुलींवर होणारे संस्कार, पालकांशी असलेला संवाद आणि कौटुंबिक मूल्यांचे जतन करण्याची आज नितांत आवश्यकता आहे. तसेच त्यांनी सनातन भारतीय संस्कृती आणि संस्कारांचे महत्त्वही अधोरेखित केले

सौ. उज्वला गौड (सरचिटणीस, भारतीय महिला मोर्चा, पुणे शहर) यांनी सनातन धर्मात वटवृक्षाला साक्षात श्री विष्णूंचे रूप मानले जाते अशी श्रद्धा असल्याचे मत व्यक्त करत सत्यवान आणि सावित्री या पौराणिक कथेचा संदर्भ दिला.

या प्रसंगी हिंदु जनजागृती समितीच्या रणरागिणी शाखेच्या कु. क्रांती पेटकर म्हणाल्या की, "काही संघटनांनी येथे पूजन बंद करण्याची मागणी केली होती आणि त्यानुसार पुरातत्व विभागाने आदेशही दिले होते. मात्र, स्थानिक महिला, विविध हिंदुत्वनिष्ठ संघटना आणि खासदार प्रा.डॉ.मेधाताई कुलकर्णी या सर्वांच्या प्रयत्नांमुळेच आज येथे पुन्हा एकदा पूजा उत्साहात संपन्न होऊ शकली".

या यशस्वी सोहळ्यात हिंदु जनजागृती समिती, रणरागिणी शाखा, सकल हिंदू समाज, स्थानिक नगरसेविका ऐश्वर्या थोरात, मृणाल कांबळे, स्नेहा माळवदे, सौ. उज्वला गौड, सरचिटणीस, भारतीय महिला मोर्चा, पुणे शहर आणि मोठ्या संख्येने स्थानिक महिला सहभागी झाल्या होत्या. स्थानिक महिलांनी उपस्थित मान्यवरांचा सत्कार यावेळी केला तसेच खासदार प्रा. डॉ.मेधाताई कुलकर्णी यांनी उपस्थित काही महिलांचा सत्कारही केला.

## याज्ञवल्क्य आश्रमाच्या ९९ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध पुरस्कार प्रदान

पुणे (दै. संध्या)

याज्ञवल्क्य आश्रमाचा ९९ व्या वर्धापन दिन व शताब्दी वर्षारंभ सोहळ्यानिमित्त विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. बाळकृष्ण वाडेकर यांना याज्ञवल्क्य पुरस्कार, अस्मिता चिंचाळकर यांना बालगंधर्व पुरस्कार, मीनाताई कुर्लेकर यांना मुक्ताई पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच श्रीकांत पेटकर आणि ज्योती घोडके यांना ज्येष्ठ कार्यकर्ता पुरस्कार, तर शुभांगी गुंड आणि अभिजीत कोळेश्वर यांना सक्रिय कार्यकर्ता पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कसबा पेठ येथील याज्ञवल्क्य आश्रमाचा ९९ वा वर्धापन दिन व शताब्दी वर्षारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे पद्माकर कुलकर्णी कुंडेकर महाराज उपस्थित होते. संस्थेचे कार्याध्यक्ष जगदीश नगरकर, कार्यवाह प्रमोद चंद्रात्रेय, ज्ञानेश्वर बेल्हे, अरुण खेडकर, उल्हास पाठक, सुचेता पाताळे, सुजाता मवाळ, मनोज तारे, तृप्ती तारे तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य आणि सभासद यावेळी उपस्थित होते. पद्माकर कुलकर्णी कुंडेकर महाराज म्हणाले, एखादी संस्था शंभर वर्षे कार्यरत राहण्यासाठी निष्ठावंत कार्यकर्ते, पदाधिकारी आणि सामाजिक कार्य महत्त्वाचे असते.

अशा संस्थांचे कार्य पुढे सुरू राहण्यासाठी तरुणांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला पाहिजे. अशा संस्थांमुळेच समाजात मानवता आणि आपुलकी टिकून राहते, असेही त्यांनी सांगितले. शर्वरी पारेकर हिने नृत्यातून गणेश वंदना सादर केली. यशश्री पुणेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# आत्मनिर्भर भारतासाठी कौशल्याधिष्ठित शिक्षण गरजेचे : डॉ. राजेंद्र हिरेमठ

### जय गणेश विद्यार्थी पालकत्त्व योजना माजी विद्यार्थी मेळावा व विविध ७५ पेक्षा जास्त स्किलिंग कोर्सेसमधील १०० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान

पुणे (दै. संध्या)

आजच्या स्पर्धेच्या युगात केवळ पुस्तकी शिक्षण पुरेसे नाही. ज्ञानाला कौशल्याची जोड मिळाली, तरच आत्मविश्वास, रोजगार आणि समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा निर्माण होते. म्हणूनच आज कौशल्याधारित शिक्षण ही काळाची गरज बनली आहे. भारत २०४७ मध्ये विकसित देश होईल, हे स्वप्न आपण पहात आहोत. मात्र, अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी ज्या गोष्टीची गरज आहे, ती पूर्ण होणे आवश्यक आहे. त्यासाठी तरुणाईला कौशल्याधिष्ठित शिक्षण देणे गरजेचे आहे. ही गरज ओळखून 'दगडूशेठ' गणपती ट्रस्ट कार्यरत आहे, असे मत सीओईपी भाऊ इन्स्टिट्यूटचे चेअरमन डॉ. राजेंद्र हिरेमठ यांनी व्यक्त केले.



श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे जय गणेश ज्ञानवर्धन अभियान अंतर्गत जय गणेश विद्यार्थी पालकत्त्व योजना माजी विद्यार्थी मेळावा व विविध स्किलिंग कोर्सेस प्रमाणपत्र वाटप कार्यक्रमाचे आयोजन सदाशिव पेठेतील फडके हॉल येथे करण्यात आले. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, विजय भालेराव, राजाभाऊ कदम, ज्ञानदीप अकॅडमी चे महेश शिंदे, राजाभाऊ पायमोडे, विलास रासकर, विश्वास पलुसकर आदी उपस्थित होते. यावेळी १०० हून अधिक माजी विद्यार्थी देखील सहभागी झाले होते.


माजी विद्यार्थीनी साक्षी दगडे म्हणाली, मी इयत्ता ५ वी मध्ये असताना योजनेत आले होते. तेव्हा नुकतीच ही योजना सुरु झाली. कोणाशीही बोलायला मी घाबरत होते. पण आज मी माझे विचार स्वतंत्रपणे मांडू शकते. ट्रस्टच्या माध्यमातून माझा सर्वांगीण विकास झाला असून माझ्यासारख्या अनेकांच्या पंखाना बळ मिळाले आहे. आम्ही देखील भविष्यात असेच समाजासाठी कार्य करू, असेही तिने सांगितले. विद्या अंबर्डेकर आणि अंकिता शिळीमकर यांनी सूत्रसंचालन केले.

ट्रस्टतर्फे सुरु असलेल्या ७५ पेक्षा जास्त स्किलिंग कोर्सेसमधील १०० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. आरी वर्क, नेल आर्ट, फॅब्रिक पेंटिंग, मेहंदी, ब्युटिशियन यांसारख्या विविध कोर्सचा समावेश आहे. तरुणींना आत्मनिर्भर करण्याकरिता हे कोर्स उपयुक्त असून आत्मनिर्भर भारताकडे पुढचे पाऊल टाकण्याच्या दृष्टीने दगडूशेठ गणपती ट्रस्ट यामाध्यमातून खारीचा वाटा उचलत आहे.

डॉ. राजेंद्र हिरेमठ म्हणाले, आत्मनिर्भर भारत म्हणून आपण स्वप्न पाहिले आहे. त्यासाठी विज्ञानावर आधारित संशोधन गरजेचे आहे. अनेक स्टार्ट अप सुरु होणे देखील आवश्यक आहे. सरकार यासाठी मोठे सहाय्य देऊन सोयी-सुविधा पुरवत आहे. आज तरुणाई मोबाईलच्या विळख्यात अडकत चालली आहे. त्यातून बाहेर पडून चांगला वेळ कसा देता येईल, हे पाहायला हवे.

महेश सूर्यवंशी म्हणाले, सन २०१० पासून पालकत्व योजना सुरु असून तब्बल ६० हून अधिक शाळांचा यामध्ये समावेश आहे. आता कौशल्य वर्गाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होत चांगले व्यक्तिमत्व घडावे, हा ट्रस्टचा प्रयत्न आहे. समाजात मानसिक विकृती वाढत असून त्यामुळे आजच्या पिढीत चांगले संस्कार व मूल्य रुजविण्याचा आमचा प्रयत्न आहे. आज योजनेतून बाहेर पडलेले अनेक विद्यार्थी चांगल्या पदावर कार्यरत आहेत. कोर्सेसच्या माध्यमातून केवळ तांत्रिक प्रशिक्षण दिले जात नाही, तर व्यक्तिमत्त्व विकास, संवाद कौशल्य, शिस्त, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुणही विकसित केले जात आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### "डम्पी" कथा महाविद्यालयीन अभ्यासक्रमात

भिवंडी (दैनिक संध्या) : पालघर जिल्ह्यातील सुप्रसिद्ध खगोल अभ्यासक व लेखक चंद्रकांत घाटाळ यांच्या "डम्पी" विज्ञान कथेचा यंदाच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या तृतीय वर्ष कला अभ्यासक्रमात समावेश केला आहे. चंद्रकांत घाटाळ यांचे डम्पी हे पुस्तक २०२३ साली डिंपल पब्लिकेशन यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले होते. सदर पुस्तकाचे मुखपृष्ठ सरदार जाधव यांनी काढले असून याची प्रस्तावना प्रसिद्ध विज्ञान लेखक जोसेफ तुस्कानो यांनी लिहिली आहे. वाचकांच्या प्रचंड प्रतिसादामुळे २०२६ साली याची दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली आहे. सदर पुस्तकाची किंमत २०० रूपये असून ते ॲमेझॉन व फ्लिपकार्ट वर देखील उपलब्ध आहे. या पुस्तकाची शीर्षक कथा "डम्पी " हिचा महाविद्यालयीन अभ्यासक्रमात समावेश झाल्याबद्दल घाटाळ यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### विकास करार रद्द झाल्यास मुद्रांक शुल्क परतावा बंद

■ महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात सुधारणा विधेयक विधानसभेत सादर; महसुलाचे नुकसान टाळण्यासह तरतुदींचा गैरवापर रोखण्यासाठी निर्णय

मुंबई (दैनिक संध्या) : विकास करार रद्द, निरस्त किंवा समाप्त झाल्यास कोणत्याही परिस्थितीत मुद्रांक शुल्काचा परतावा किंवा सवलत दिली जाणार नाही, अशी तरतूद असलेले महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम ४८ मध्ये सुधारणा करणारे विधेयक मंगळवारी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत मांडले. राज्याच्या महसुलाचे संरक्षण करणे आणि कायद्यातील पळवाटांचा होणारा गैरवापर रोखणे हा या सुधारणेचा मुख्य उद्देश आहे. प्रत्यक्ष व्यवहारात असे निदर्शनास आले आहे की, विकास करारांच्या संदर्भात मोठ्या प्रमाणावर मुद्रांक शुल्क भरले जाते. तथापि, व्यावसायिक कारणांमुळे किंवा परस्पर मतभेदांमुळे हे करार पुढील टप्प्यावर रद्द, निरस्त किंवा समाप्त केले जातात आणि त्यानंतर भरलेल्या मुद्रांक शुल्काच्या परताव्यासाठी शासनाकडे अर्ज सादर केले जातात. अशा प्रकरणांमध्ये तथ्य पडताळणी करताना प्रशासकीय अडचणी निर्माण होतात आणि परताव्याचे अनेक दावे वाढतात. मुद्रांक शुल्क हा दस्ताच्या अंमलबजावणीवर आकारला जातो; कराराची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली किंवा नाही, यावर तो अवलंबून नसतो. त्यामुळे करार रद्द झाला तरी अशा प्रकरणांमध्ये परतावा देणे महसुली दृष्ट्या राज्यासाठी प्रतिकूल व नुकसानकारक ठरत होते. तसेच कायद्यातील सवलतींच्या तरतुदींचा गैरवापर होण्याची शक्यता निर्माण झाली होती. राज्याच्या महसुलाचे संरक्षण करणे तसेच कायद्याची अंमलबजावणी संपूर्ण राज्यात एकसमान व स्पष्टपणे व्हावी, यासाठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम ४८ मधील परंतुका नंतर सदर परंतुकाची शिथिलता किंवा परताव्याची तरतूद ही 'करारनाम्याप्रमाणेच' समान मुद्रांक शुल्क लागू होणाऱ्या विकास करारासह इतर कोणत्याही दस्तांना लागू होणार नाही. अशी नोंद करण्यात येणार आहे.

### ग्रामपंचायत संगणक परिचालकांना किमान 20 हजार मानधन द्या : आमदार बच्चू कडू

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यातील ग्रामीण भागाच्या सक्षमीकरणात आणि डिजिटल सेवा पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या ग्रामपंचायत संगणक परिचालकांच्या मानधनाचा प्रश्न, त्यांच्या सेवेचे नेमके स्वरूप आणि ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांचा मुद्दा आज विधानपरिषदेत लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून चांगलाच गाजला. गावपातळीवर रात्रंदिवस सेवा देणाऱ्या या घटकाला न्याय मिळावा म्हणून लोकप्रतिनिधींनी सभागृहात अत्यंत आक्रमक भूमिका घेतली. या महत्त्वपूर्ण विषयाची गांभीर्याने दखल घेत, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी सरकारची सकारात्मक बाजू मांडली आणि संगणक परिचालक संघटनांचे प्रतिनिधी, संबंधित आमदार व वरिष्ठ विभागीय अधिकाऱ्यांची तातडीने एक संयुक्त बैठक बोलावून यावर सर्वसमावेशक व सुवर्णमध्य साधणारा मार्ग काढण्याचे महत्त्वपूर्ण आश्वासन सभागृहात दिले. शिवसेनेचे आमदार बच्चू कडू यांनी संगणक परिचालकांच्या मानधनाचा मुद्दा लक्षवेधी सूचनेद्वारे मांडला. ग्रामीण भागात तळागाळातील नागरिकांना डिजिटल सेवा पुरवणाऱ्या संगणक परिचालकांना सध्या मिळणारे १० हजार रुपये मानधन अपुरे असल्याचे त्यांनी नमूद केले. परिचालकांना 'ग्रामपंचायत सहाय्यक' असा दर्जा देऊन त्यांचे मानधन किमान १८ ते २० हजार रुपये करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली. तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि खासगी कंपनीमार्फत फिरत जाणारा निधीचा प्रवास थांबवून, हे मानधन थेट ग्रामपंचायतीमार्फत परिचालकांच्या खात्यात जमा करण्यात यावे, जेणेकरून त्यांना वेळेवर आणि योग्य न्याय मिळेल, असे मत बच्चू कडू यांनी व्यक्त केले. या चर्चेत आमदार प्रवीण दरेकर, भाई जगताप, प्रसाद लाड आदी सदस्यांनीही भाग घेत किमान वेतन कायद्यानुसार परिचालकांना अधिक दिलासा देण्याची मागणी केली.

### पाषाण तलाव सांडपाणी प्रकल्पातील त्रुटींची होणार चौकशी!

मुंबई (दैनिक संध्या) : पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांमधील (STP) त्रुटी आणि गृहनिर्माण संस्थांमधील बंद केंद्रांविषयी आज विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान भाजप आमदार उमा खापरे यांनी महत्त्वपूर्ण प्रश्न उपस्थित करत प्रशासनाला प्रश्न सप्तहित केला. नागरिकांच्या आरोग्याशी निगडित असलेल्या या गंभीर प्रश्नावर उमा खापरे यांनी विचारलेल्या प्रश्नांना उद्योग मंत्री उदय सामंत यांनी शासनाच्या वतीने सविस्तर उत्तरे देत वस्तुस्थिती सभागृहात मांडली. आमदार उमा खापरे यांनी पुणे शहरातील औंध-पाषाण, सुतारवाडी येथील पाषाण तलावामध्ये उभारण्यात आलेल्या सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पाचा मुद्दा सभागृहात मांडला. या सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पात अनेक त्रुटी असून, त्यामुळे पाण्याचे पुरेसे शुद्धीकरण होत नसल्याची बाब एप्रिल २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे का? असा थेट प्रश्न त्यांनी विचारला होता. यावर शासनाकडून सुरुवातीला "हे खरे नाही" असे लेखी उत्तर आल्याने त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. एका बाजूला त्रुटी नसल्याचे सांगायचे आणि दुसऱ्या बाजूला पाषाण येथील प्रकल्पाची क्षमता वाढवण्यासाठी जागा उपलब्ध नाही, तसेच भविष्यात इतर ठिकाणी प्रक्रिया करण्याचे नियोजन असल्याचे उत्तर द्यायचे, या परस्परविरोधी उत्तरांमुळे एकाच प्रश्नात दोन वेगवेगळे विषय आल्याने त्यांनी या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली. याशिवाय, त्यांनी पाषाण तलावाच्या ठिकाणी क्षमता वाढवण्यासाठी जागा कधी उपलब्ध होणार आणि या एसटीपी प्रकल्पाच्या देखभाल-दुरुस्तीच्या खर्चाची देय रक्कम किती आहे, याबाबतही प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले की, सांडपाणी शुद्धीकरणाच्या या कामासाठी २३ सप्टेंबर २०२२ रोजी 'प्राइम इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सल्टंट प्रायव्हेट लिमिटेड'ची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर 'मेसर्स परशुराम कन्स्ट्रक्शन'ला ४ कोटी ३१ लाख रुपयांचे टेंडर देण्यात आले होते.

## मुंबईतील अनधिकृत नळजोडण्यांवर ९० दिवसांत होणार मोठी कारवाई

मुंबई (दै. संध्या) :

■ पाणीचोरी रोखण्यासाठी सरकारची विशेष मोहीम - मंत्री सामंत

■ भविष्यातील पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना; जलप्रकल्पांचे नियोजन



मुंबई शहरातील पाणीटंचाई आणि पाणीचोरीच्या समस्येवर आज विधान परिषदेत गंभीर चर्चा झाली. मुंबईतील वाढत्या पाणीटंचाईला अनधिकृत नळजोडण्या, पाणीचोरी आणि नियोजनातील त्रुटी मोठ्या प्रमाणात कारणीभूत असल्याचे समोर आले आहे. मालवणी, मानखुर्द, कुर्ला, साकीनाका, गोवंडी, कलीना यांसारख्या विविध भागांतील अनधिकृत नळजोडण्या, बेकायदेशीर हॉटेल्स, गॅरेजेस आणि वाहन धुलाई केंद्रांमुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याची चोरी होत असल्याचा मुद्दा भाजप आमदार राजहंस सिंह यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे सभागृहात मांडला. यावर सकारात्मक उत्तर देत, पुढील ९० दिवसांत मुंबई शहरात विशेष मोहीम राबवून सर्व अनधिकृत नळजोडण्या शोधून त्या तात्काळ तोडण्याचे आदेश दिले जातील, अशी स्पष्ट ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सभागृहात दिली.

सभागृहात अधिक माहिती देताना आमदार राजहंस सिंह म्हणाले की, मुंबईला दररोज सुमारे ४,६६५ एमएलडी (दशलक्ष लिटर प्रतिदिन) पाण्याची गरज असताना प्रत्यक्षात ४,१०० एमएलडी पाणीपुरवठा होत आहे, म्हणजेच सध्या ५६५ एमएलडी पाण्याची तूट आहे. मुंबईकर नागरिक नियमितपणे पाणीपट्टी भरत असताना, काही बेकायदेशीर जोडण्यांमुळे नागरिकांच्या हक्काचे पाणी चोरीला जात आहे. अशा सर्व अनधिकृत व्यावसायिक आस्थापनांचे पाणी व वीज कनेक्शन तातडीने तोडण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली. तसेच, उत्तर मुंबईतील गणेश टेकडी, शिव टेकडी, कुरार यांसारख्या उंचावरील भागांमध्ये पाणी पोहोचत नसताना मलबार हिलसारख्या भागात नियमित पुरवठा होतो, ही विसंगती दूर करून गरीब वस्त्यांनाही समान न्यायाने पाणीपुरवठा व्हावा, असे त्यांनी अधोरेखित केले.

भाजप आमदार राजहंस सिंह यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले की, मुंबईच्या भविष्यातील वाढती गरज लक्षात घेऊन शासन विविध स्तरांवर काम करत आहे. यासाठी गारगाई धरण प्रकल्प (४४० एमएलडी), मालाड-मनोरी आणि अंधेरी-वर्सोवा येथील डिसॅलिनेशन (समुद्राच्या पाण्याचे गोड्या पाण्यात रूपांतर करणे) प्रकल्प, तसेच दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्प टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्याचे नियोजन सरकारने केले आहे. प्रशासनाने केलेल्या आतापर्यंतच्या कारवाईची माहिती देताना मंत्र्यांनी सांगितले की, जानेवारी २०२६ ते जून २०२६ या अवघ्या सहा महिन्यांच्या कालावधीत २,२५७ अनधिकृत नळजोडण्या तोडण्यात आल्या आहेत. तसेच मालवणी, मानखुर्द, साकीनाका, कुर्ला या भागांतील ४७ गॅरेजेसचा बेकायदेशीर पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे. मात्र, सदस्यांनी व्यक्त केलेली चिंता लक्षात घेता, यापुढे अधिकाधिक कडक पावले उचलली जातील आणि ९० दिवसांत विशेष मोहीम राबवून ही कारवाई पूर्ण केली जाईल.

याच चर्चेदरम्यान भाजप आमदार प्रवीण दरेकर यांनी नव्याने उभारल्या जाणाऱ्या उंच टॉवर्सना मंजुरी देताना पाण्याच्या उपलब्धतेची तपासणी केली जाते का, असा प्रश्न उपस्थित केला. टॉवरमधील रहिवाशांना पाणी मिळते, मात्र टेकड्यांवरील झोपडपट्ट्या आणि मध्यमवर्गीय वसाहतींना पाण्यापासून वंचित राहावे लागते, याकडे त्यांनी लक्ष वेधले. तसेच दहिसरजवळील वनजमिनीवर नवीन धरण उभारण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव त्यांनी सरकारसमोर मांडला.

यावर उत्तर देताना मंत्री सामंत यांनी स्पष्ट केले की, कोणत्याही नव्या इमारतीला परवानगी देताना तिच्या पाणीगरजेचे संपूर्ण गणित महानगरपालिका आधी तपासून पाहत असते आणि स्थानिक स्वराज्य संस्थेवरच त्या इमारतीला पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी असते. दरेकर यांनी सुचवल्याप्रमाणे भविष्यातील गरज ओळखून शासन पर्यायी जलस्रोत विकसित करण्याबाबत सकारात्मक विचार करत आहे.

## शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी घेतली घटनास्थळी धाव

मुंबई (दै. संध्या) :

चेंबूर येथील ११ व्या रोडवर आज दुपारी २:५० च्या सुमारास युनिव्हर्सल प्रायव्हेट स्कूल, टिळकनगर यांच्या बसवर झाड कोसळल्याची दुर्दैवी घटना घडली. या गंभीर अपघाताची माहिती मिळताच शालेय शिक्षण मंत्री श्री दादाजी भुसे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. या दुर्घटनेत विद्यार्थी विहांग श्रीवास्तव याचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, मंत्री भुसे यांनी या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त करत शोककुल पालकांचे सांत्वन केले. मंत्री महोदयांनी दुर्घटनाग्रस्त बसची आणि परिसराची पाहणी करत परिस्थितीचा आढावा घेतला. घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर मंत्री श्री भुसे यांनी चेंबूर येथील जैन हॉस्पिटलला भेट दिली, जिथे या अपघातातील जखमी विद्यार्थ्यांवर उपचार सुरू आहेत. त्यांनी यावेळी जखमी विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली,कुटुंबीयांचे सांत्वन केले आणि डॉक्टरांना त्यांच्या उपचारांत कोणतीही कसूर न ठेवता सर्वोत्तम वैद्यकीय सुविधा पुरवण्याच्या सूचना दिल्या.

## बाधित सर्व शिक्षक परीक्षार्थींना सरसकट पास म्हणून घोषित करा

भिवंडी (दै. संध्या) :

■ मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाची मुख्यमंत्री व राज्याच्या मुख्य सचिवांकडे मागणी



टीईटी परीक्षा पेपरफुटी प्रकरणामुळे हजारो प्रामाणिक शिक्षक परीक्षार्थींचे शैक्षणिक, आर्थिक व मानसिक नुकसान झाले असून, या सर्व बाधित उमेदवारांना न्याय देण्यासाठी त्यांना सरसकट पात्र (पास) घोषित करावे किंवा कायद्याच्या चौकटीत न्याय्य दिलासा देणारा विशेष निर्णय घ्यावा, अशी मागणी मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. विशाल कडणे यांनी मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राज्यातील हजारो डी.एड./बी.एड. धारक उमेदवारांनी अनेक महिने कठोर परिश्रम करून टीईटी परीक्षेची तयारी केली होती. मात्र, परीक्षार्थींची कोणतीही चूक नसताना प्रश्नपत्रिका फुटीच्या गंभीर प्रकारामुळे परीक्षा प्रक्रियेवर परिणाम झाला. परिणामी, निष्पाप उमेदवारांनाच त्याची शिक्षा भोगावी लागत आहे.

मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाने भारतीय राज्यघटनेतील समानतेचा अधिकार (कलम १४), नैसर्गिक न्यायाची तत्त्वे आणि न्याय्य प्रशासकीय निर्णयप्रक्रियेचा आधार घेत शासनाने विद्यार्थ्यांच्या हिताचे संरक्षण करावे, अशी भूमिका मांडली आहे. शासन यंत्रणेतील त्रुटींची किंमत प्रामाणिक विद्यार्थ्यांनी मोजणे अन्यायकारक असल्याचेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

प्रा. डॉ. विशाल कडणे म्हणाले, "प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांनी फुटवलेली नाही. त्यामुळे त्याची शिक्षा विद्यार्थ्यांना मिळू नये. शासनाने संवेदनशील भूमिका घेत सर्व बाधित शिक्षक परीक्षार्थींना न्याय मिळेल असा तातडीने निर्णय घ्यावा."

मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाने शासनाकडे या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन सर्व बाधित परीक्षार्थींना न्याय मिळेल, असा सकारात्मक निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

## सोनी पलवर पुन्हा रंगणार रामानंद सागर यांचे 'रामायण'

नवी दिल्ली (दै. संध्या) :

■ ६ जुलैपासून दर सोमवार ते शनिवार रात्री ८ वाजता प्रसारण

■ आधुनिक काळातील तणावातून शांततेकडे नेणारी अजरामर गाथा नव्या पिढीसमोर




भारतातील लोकप्रिय विनामूल्य मनोरंजन वाहिनी सोनी पल प्रेक्षकांसाठी पुन्हा एकदा रामानंद सागर यांची अजरामर 'रामायण' मालिका घेऊन येत आहे. ६ जुलैपासून दर सोमवार ते शनिवार रात्री ८ वाजता ही मालिका प्रसारित होणार आहे. १९८७ मध्ये प्रथम प्रसारित झालेल्या 'रामायण' मालिकेने भारतीय दूरचित्रवाणीच्या इतिहासात सांस्कृतिक पर्व घडवले होते. प्रत्येक रविवारी सकाळी संपूर्ण देश या मालिकेसाठी थांबत असे. ७८ भागांच्या या मालिकेने केवळ मनोरंजनच नाही, तर भारतीय संस्कृती, श्रद्धा, भक्ती आणि कौटुंबिक मूल्यांची जपणूक करणारा एक सांस्कृतिक वारसा निर्माण केला. हनुमान आणि यशोमती मय्या या लोकप्रिय भक्तिमय मालिकांच्या यशानंतर आता सोनी पल आपल्या भक्तिपूर्ण कार्यक्रमांच्या मालिकेत आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठत आहे. प्रभू श्रीरामांचे आदर्श जीवन, माता सीतेचा त्याग, लक्ष्मणाची निष्ठा आणि भगवान हनुमानांची अखंड भक्ती यांचे दर्शन घडवणारी ही मालिका आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात मनःशांती, संयम आणि सकारात्मकतेचा संदेश देणारी ठरेल. प्रभू श्रीरामांच्या जीवनप्रवासातून धर्म, कर्तव्य, करुणा आणि शौर्याची शिकवण देणारे हे महाकाव्य आजही तितकेच प्रेरणादायी आहे. प्रभावी कथानक, संस्मरणीय संवाद आणि उत्कृष्ट अभिनयामुळे 'रामायण' ही केवळ दूरचित्रवाणी मालिका नसून भारतीय संस्कृतीचा जिवंत वारसा मानली जाते. सोनी पलचे प्रवक्ते म्हणाले, "रामायण ही केवळ एक कथा नाही, तर ती भारताच्या सामूहिक स्मृतीचा आणि सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य भाग आहे. आजही ही मालिका भक्ती, एकात्मता आणि जीवनमूल्यांची प्रेरणा देते. प्रत्येक घरापर्यंत अर्थपूर्ण आणि मनाला स्पर्श करणारे मनोरंजन पोहोचवण्याच्या आमच्या वचनबद्धतेचा हा पुनरुच्चार आहे." भारतीय संस्कृतीचे तेजस्वी प्रतीक असलेले 'रामायण' आता नव्या पिढीलाही अनुभवता येणार असून, ६ जुलैपासून दर सोमवार ते शनिवार रात्री ८ वाजता, फक्त सोनी पलवर ही अजरामर गाथा पाहायला मिळणार आहे.

## बंधन लार्ज कॅप फंडाचा २० वर्षांचा टप्पा

पुणे (दै. संध्या) :

■ शिस्तबद्ध गुंतवणुकीतून दीर्घकालीन संपत्ती निर्मितीवर भर

बंधन लार्ज कॅप फंडाने यशस्वीपणे २० वर्षांचा प्रवास पूर्ण करत दीर्घकालीन आणि शिस्तबद्ध गुंतवणुकीचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. गेल्या दोन दशकांत बाजारातील अनेक चढ-उतार, आर्थिक मंदी, तेजी आणि संरचनात्मक बदलांचा सामना करताना या फंडाने मूलभूतदृष्ट्या सक्षम लार्ज कॅप कंपन्यांमध्ये सातत्यपूर्ण गुंतवणुकीच्या धोरणावर भर दिला आहे. लार्ज कॅप कंपन्या कोणत्याही मजबूत गुंतवणूक पोर्टफोलिओचा कणा मानल्या जातात. मोठा व्यवसाय, मजबूत आर्थिक पाया, चांगले कॉर्पोरेट प्रशासन आणि सातत्यपूर्ण रोख प्रवाह निर्माण करण्याची क्षमता यामुळे या कंपन्या बाजारातील अस्थिरतेतही तुलनेने अधिक स्थिर राहतात. त्यामुळे दीर्घकालीन भांडवली वाढ आणि स्थिर परतावा शोधणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी लार्ज कॅप गुंतवणूक महत्त्वाची मानली जाते. सध्याच्या बाजारस्थितीत लार्ज कॅप कंपन्यांचे मूल्यांकन तुलनेने आकर्षक झाले आहे.

**जाहीर नोटीस**

कोळमाथा विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. कोळमाथा या संस्थेचे वार्षिक सर्वसाधारण सभेचे दिनांक-१८/०९/२०२५ रोजीचे ठराव नंबर १० नुसार १) संस्थेचे ज्या सभासदांचे शेअर्स रक्कम रुपये १० पासून ते १२० रुपये पर्यंत आहे. त्यांनी आज पासून १५ दिवसाचे आत आपली शेअर्स रक्कम रुपये ६००/-चा भरणा करावा २) संस्थेचे वार्षिक सर्वसाधारण सभेचे दिनांक १८/०९/२०२५ रोजीचे ठराव नंबर ११ नुसार संस्थेचे जे सभासद मयत झाले आहे आशा सभासदांच्या वारसांनी आज असून १५ दिवसाचे आत वारस नोंद करावी अन्यथा असे न केल्यास आपली कुठलीही तक्रार नाही असे समजून आपले सभासदत्व कमी करण्यात येऊन आपली असणारी शेअर्स रक्कम संस्थेच्या गंगाजळी जमा करण्यात येईल.

कळावे

ठिकाण : ओतूर

आपले विश्वासू
कोळमाथा विविध कार्यकारी सेवा
सहकारी सोसायटी लि.कोळमाथा

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११०१८**

कटिबध्दा जनहिताय

उद्यान विभाग

ई निविदा नोटीस क्रमांक –वृक्ष ०५/२०२६–२०२७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वृक्षसंवर्धन विभागाकडील शोभिवंत रोपे पुरविणे साठीचे ई टेंडर अंतर्गत पिंपरी चिंचवड मनपा कडील नोदणीकृत ठेकेदाराकडुन निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | उद्यानाचे नाव | निविदा र,रु. | बयाणा र,रु. | अनामत र.रु. | कामाची मुदत | निविदा फार्म फी परत न मिळणारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मनपाचे विविध रस्ते,उद्याने सुशोभिकरणासाठी उद्यान/ वृक्षसंवर्धन विभागासाठी शोभिवंत रोपे पुरविणे (प्रपत्र अ नुसार ) | १,७४,७२,५२५/- | १,७४,७२५/- | ८,७३,६२६/- | ०३ महिने | ४६३७/- |

निविदेचे वेळापत्रक

| | |
|---|---|
| ई- निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक : ०१/०७/२०२६ ते ०८/०७/२०२६ |
| निविदा स्विकृती अंतिम दिनांक व वेळ | दिनांक : ०८/०७/२०२६ दुपारी ३.०० पर्यंत |
| निविदा उघडणेचा दिनांक | दिनांक : १०/०७/२०२६ दुपारी ३.००वा.(शक्य झालेस) |
| निविदा पूर्व बैठक ( Pre Bid Meeting) | दिनांक : ०३/०७/२०२६ |

कोणतेही कारण न देता निविदा पुर्णता किंवा अंशता मंजुर अथवा नामंजुर करणेचा अधिकार मा. आयुक्त यांनी स्वता कडे राखून ठेवला आहे. निविदा संचाची विक्री https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई निविदा सुचनेत नमुद केलेल्या तारखेनुसार सुरू राहिल.सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

१. सदरची निविदा https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सदरची ई निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ईमेल support-eproc@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462, 0120-4001002, 0120-4001005, 0120-6277787 या दुरध्वनीवर संपर्क साधावा.

जाहिरात क्रमांक - 2026-27/78
क्रमांक - उदयान/०४/कावि/२६९/२०२६
दिनांक – ३०/०६/२०२६

सही/-
अति. आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांचे कार्यालय**
**हमाल पुरवठा करणेसाठी निविदा सुचना**

जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
निवडणूक शाखा
पीईई-1A/कावि/525/2026
दि. 30/06/2026

पुणे जिल्ह्यामध्ये आगामी कालावधीमध्ये मा. निवडणूक आयोग, भारत सरकार व मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचे निर्देशानूसार होणाऱ्या सर्व आगामी निवडणूक कामकाजाकरीता, तसेच सदर निवडणूकांच्या पुर्व तयारीकरीता जिल्हा निवडणूक कार्यालय पुणे, व जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघ, मुख्यालय अथवा सक्षम प्रधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी निवडणूक व इतर अनुषांगिक कामाकाजासाठी हमाल पुरवठा करणेकामी अनुभवी व योग्य अभिकर्त्याकडुन विहीत नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

निविदेच्या कामाचा तपशील :-

मा. केंद्रीय निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोग यांचे आदेशानुसार पुणे जिल्ह्यातील होणाऱ्या आगामी लोकसभा/विधानसभा/ विधानपरिषद / शिक्षक व पदवीधर सार्वत्रिक निवडणूक कामकाजाकरीता तसेच सदर निवडणूकांच्या पुर्व तयारीकरीता जिल्हा निवडणूक कार्यालय पुणे, जिल्हयातील सर्व विधानसभा मतदार संघ, मुख्यालय अथवा सक्षम प्रधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी अंदाजे ४०० ते ४५० हमाल पुरवठा करणेसाठी ई निविदेचा तपशील खालील प्रमाणे :-

सदर निविदेची कार्यक्रम पत्रीका खालील प्रमाणे राहील :-

| | |
|---|---|
| निविदा अंदाजित रक्कम रुपये | २०,०००,००/- (रु. वीस लाख रू. फक्त) |
| कोऱ्या ई निविदा फॉर्मची किंमत रक्कम रुपये (ऑनलाईन भरणा केलेली पावती जोडावी) | ६,०००/- (रु. सहा हजार फक्त) (विना परतावा) |
| बयाणा EMD रक्कम रुपये (ऑनलाईन भरणा केलेली पावती जोडावी) | ५०,०००/- (रु. पन्नास हजार फक्त) |
| सुरक्षा अनामत रक्कम रुपये (ई-निविदा मंजूर झालेनंतर राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी) | ६०,०००/- (रु. साठ हजार फक्त) |
| ई-निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | ०१/०७/२०२६ दुपारी ४.०० वाजता |
| ई-निविदा ऑनलाईन स्वीकृतीचा दिनांक व वेळ | ०१/०७/२०२६ ते ११/०७/२०२६ दुपारी ४.०० वाजता |
| निविदा पुर्व बैठक Pre- Tender Conference (PTC) दिनांक व वेळ | ०६/०७/२०२६ दुपारी ४.०० वाजता |
| ई-निविदा लिफाफा क्र. १ (निविदा तांत्रिक लिफाफा) उघडण्याचा दिनांक व वेळ | १२/०७/२०२६ दुपारी ४.०० वाजता |
| ई-निविदा लिफाफा क्र. २ (व्यावसायिक/दराबाबतचा लिफाफा) उघडण्याचा दिनांक व वेळ | तांत्रिक निविदा उघडण्यात आल्यानंतर व्यावसायिक दराच्या लिफाफा उघडण्याबाबत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सुचित केली जाईल. |
| ई-निविदा उघडण्याचे ठिकाण | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांचे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे, नवीन इमारत, बी. विंग. चौथा मजला, पुणे येथे राहील. |
| निविदा करार कालावधी | २ वर्ष |
| ई-निविदा संपर्क अधिकारी | श्री. संतोष सानप ना. तह. मो. क्र. 8669971285 |

टिप :-

1. ज्या निविदाधारकांचे निविदा अर्ज http://mahatenders.gov.in या संकेस्थळावर निर्धारीत मुदतीत सादर केले जातील. केवळ त्याच निविदाधारकांच्या निविदा विचारात घेण्यात येतील. सदर निविदेची वैद्यता १२० दिवसांकरीता राहील. तसेच आवश्यकतेनुसार अतिरिक्त 60 दिवसांची मुदतवाढ देण्याचा अधिकार मा. जिल्हाधिकारी, तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांना राहील.
2. प्राप्त झालेल्या निविदा कारणाशिवाय स्वीकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी पुणे यांनी स्वतः राखून ठेवले आहेत.
3. निविदेत भाग घेणाऱ्या निविदाधारकांनी क्लास III डिजिटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर विहीत नाव नोंदणी करून घेणे आवश्यक आहे.
4. सदरची निविदा काम प्राप्त करुन देण्याची कोणतीही हमी देत नाही.
5. निविदाधारकाने/अधिकृत प्रतिनिधीने निविदा पूर्व बैठकीला Pre- Tender Conference (PTC) उपस्थित रहाणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पुर्व बैठक वरीलप्रमाणे निर्धारित दिवशी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे निवडणुक शाखा, बी विंग, चौथा मजला, पुणे येथे राहील.
6. निविदाधारकांनी अथवा त्यांनी नामनिर्देशीत केलेल्या प्रतिनिधीने निविदा उघडण्याचे वेळी जिल्हाधिकारी कार्यालय. पुणे येथे उपस्थित रहावे.
7. सदर निविदेच्या अटी व शर्ती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

क्रमांक : आरओसी-2026-27/क्र-5/C1389

सही/-
(जितेंद्र डुडी)
जिल्हाधिकारी तथा
जिल्हा निवडणूक, अधिकारी, पुणे

## थोडक्यात पण महत्वाचे...




### “गांधर्व मंच” आंतरराष्ट्रीय संगीत स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात संपन्न

चिखली (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महानगरपालिका संचलित जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ आणि अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या “गांधर्व मंच” आंतरराष्ट्रीय संगीत स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्याला ग.दि.मा. नाट्यगृह, निगडी येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्नता लाभली. संत तुकाराम महाराजांच्या ३७५ व्या वैकुंठगमन सोहळा, संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जन्मोत्सव वर्ष आणि अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या १२५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला राज्यसभा सदस्य शरदचंद्र पवार, खासदार श्रीरंग बारणे, उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, प्रसिद्ध गायक-संगीतकार अवधूत गुप्ते यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर “भक्ती सिम्फनी” या संत अभंगांवर आधारित भारतीय व पाश्चात्य वाद्यांच्या सुरेल संगमातून साकारलेल्या कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. “सुंदर ते ध्यान”, “विष्णुमय जग”, “देवाचिये द्वारी”, “ओम नमो ज्ञानेश्वरा” आदी अभंगांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. या स्पर्धेत संतरचित अभंग गायन, शास्त्रीय गायन, तबला सोलोवादन आणि पखवाज सोलोवादन या विभागांचा समावेश होता. भारतातील विविध राज्यांसह परदेशातील चार देशांतील एकूण ५७९ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला, तर अंतिम फेरीसाठी २३४ स्पर्धकांची निवड करण्यात आली होती. अंतिम फेरी चिखली येथील संतपीठात पार पडली असून त्यातून ६४ स्पर्धकांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

### दापोडीत दहा लाखांच्या एमडी ड्रग्जसह दोघांना अटक



पिंपरी (दैनिक संध्या) : दापोडी येथे अंमली पदार्थ विरोधी पथकाने कारवाई करत दहा लाखांहून अधिक किमतीचे एमडी (मेफेड्रॉन) ड्रग्ज जप्त केले. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून दुचाकी आणि मोबाईलही जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई रविवार (दि. २८) पहाटे पावणेपाच वाजण्याच्या सुमारास जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरील सर्व्हिस रोडवर सुदामाचे पोहे हॉटेलसमोर करण्यात आली. याप्रकरणी अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलिस शिपाई रणधीर माने यांनी दापोडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, आर्यन रविंद्र यादव (२०, रा. पुणे) आणि शोएब शकिल शेख ऊर्फ वस्ताद (२५, रा. रविवार पेठ, पुणे) यांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरील सीएनजी पंपाशेजारी एमडी ड्रग्जची विक्री करण्याच्या उद्देशाने आले होते. पोलिसांनी सापळा रचून त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्या झडतीत १० लाख ८५ हजार ६०० रुपये किमतीचे ९८.५६ ग्रॅम एमडी ड्रग्ज, एक दुचाकी आणि एक मोबाईल जप्त करण्यात आला. चौकशीत हे ड्रग्ज गणेश पेठ येथील शोएब शेख याच्याकडून आणल्याचे निष्पन्न झाले. दापोडी पोलिस तपास करीत आहेत.

### सांगवी पोलिसांची तत्पर कारवाई; दीड तासात अल्पवयीन मुलीचा शोध



पिंपरी (दैनिक संध्या) : सांगवी पोलिसांनी तत्परता आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे अवघ्या दीड तासात एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा शोध घेऊन तिला सुखरूप कुटुंबीयांच्या ताब्यात दिले. मिळालेल्या माहितीनुसार, काटेपुरम सोसायटी परिसरातील १७ वर्षीय मुलगी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घरातून बाहेर पडून रिक्षाने मुंबईकडे गेली होती. ही बाब कुटुंबीयांच्या निदर्शनास सुमारे तासाभराने आली. त्यांनी परिसरात शोधाशोध केल्यानंतर रात्री साडेनऊच्या सुमारास सांगवी पोलीस ठाण्यात धाव घेतली. घटनेची माहिती मिळताच सुट्टीवर असलेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नाईट ड्युटीवरील पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने संबंधित मुलगी मुंबईतील दादर परिसरात असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सांगवी पोलिसांनी दादर येथील भोईवाडा पोलीस ठाण्याशी समन्वय साधून कारवाई केली. पोलिसांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे मुलीचा शोध घेण्यात यश आले आणि तिला सुखरूप ताब्यात घेण्यात आले. मानसिक तणावातून घर सोडून गेलेल्या या मुलीला पोलिसांनी सुरक्षितपणे शोधून काढत तिच्या कुटुंबीयांच्या ताब्यात दिले. या कारवाईमुळे सांगवी पोलिसांच्या तत्परतेचे आणि कार्यक्षमतेचे कौतुक होत आहे.

### चारित्र्याच्या संशयावरुन पत्नीचा गळा दाबून खून; चिंचवड येथील घटना

पिंपरी (दैनिक संध्या) : चिंचवड येथे चारित्र्याच्या संशयावरून पत्नीचा गळा दाबून खून केल्याप्रकरणी पतीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २८ जून २०२६ रोजी दुपारी १ ते २ वाजण्याच्या दरम्यान विद्यानगर, चिंचवड येथील राहत्या घरी ही घटना घडली. या प्रकरणी महिलेच्या मुलीने फिर्याद दिली असून, तिच्या वडिलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी नागनाथ दत्तू कांबळे (वय ५४, रा. विद्यानगर, चिंचवड) याने चारित्र्याच्या संशयावरून पत्नी वैशाली नागनाथ कांबळे (वय ३५) हिचा गळा दाबून खून केला आहे. घटनेनंतर आरोपी फरार असून, पिंपरी पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

### पिंपळे गुरव मध्ये प्रॉपर्टीच्या वादातून एकाची निर्घृण हत्या

पिंपरी (दैनिक संध्या) : प्रॉपर्टीच्या कारणावरून झालेल्या वादातून एका व्यक्तीची दगडी पाटा व लोखंडी कोयत्याने वार करून हत्या केल्याची धक्कादायक घटना सांगवी पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी सेल्वराज राजंगम (वय ५२ रा. पिंपळे गुरव) याला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २८ जून रोजी पहाटे सुमारे रात्री अडीच वाजण्याच्या सुमारास लक्ष्मी नगर लेन नं.४, पिंपळे गुरव येथे ही घटना घडली. प्रॉपर्टीच्या वादातून आरोपी सेल्वराज राजंगम याने कन्नड बालकृष्ण पडाची यांच्यावर दगडी पाट्याने डोक्यात वार केला.

# ‘डेअरी फार्म’ रेल्वे उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात

**युवा नेते ऋषिकेश वाघेरे यांच्याकडून कामाची पाहणी : उड्डाणपूल संपूर्ण शहरासाठी ठरणार ‘माईलस्टोन’**

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी तोडगा काढणाऱ्या ‘डेअरी फार्म रेल्वे उड्डाणपुलाच्या’ कामाने आता अत्यंत निर्णायक टप्पा गाठला आहे. अनेक वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर अखेर या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला गती मिळाली असून रेल्वे मार्गावरील सर्वात महत्त्वाचे व आव्हानात्मक असणारे स्टील गर्डर बसविण्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. हा उड्डाणपूल पिंपरीगाव व बाजारपेठ परिसरासह संपूर्ण शहरासाठी “माईलस्टोन’ रणार असल्याचा विश्वास युवा नेते ऋषिकेश संजोग वाघेरे पाटील यांनी व्यक्त केला आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून सुमारे १,२९० मीटर लांबीच्या या भव्य उड्डाणपुलाच्या प्रत्यक्ष कामाला सन २०२३ मध्ये सुरुवात झाली होती. मात्र, सुरुवातीच्या काळात वृक्षतोड, विविध विभागांच्या तांत्रिक परवानग्या, संरक्षण विभागाची जागा आणि रेल्वे प्रशासनाची मंजुरी मिळवण्याची प्रक्रिया यामुळे या कामात अनेक कायदेशीर व तांत्रिक अडथळे आले.

परिणामी प्रकल्पाला काहीसा विलंब झाला. मात्र, महापालिकेने या सर्व अडचणींवर यशस्वीपणे मात करत आता प्रकल्प पूर्णत्वाकडे नेला आहे. या उड्डाणपुलाच्या उभारणीतील सर्वात तांत्रिक आणि जटिल भाग म्हणजे रेल्वे क्रॉसिंगवरील स्टील गर्डर बसवणे हा होता. हे काम अत्यंत सुरक्षिततेने पार पाडण्यासाठी महानगरपालिका आणि रेल्वे प्रशासनाच्या संयुक्त समन्वयाने विशेष ‘मेगा ब्लॉक’ घेतले जात आहेत. अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने दररोज हे अवजड गर्डर निश्चित जागेवर बसवून त्यांची जोडणी (लाँचिंग)



करण्याचे काम सुरू आहे. गर्डर बसवण्याचे काम पूर्ण होताच, त्यावर स्लॅब टाकणे, डांबरीकरण करणे आणि अंतिम फिनिशिंगची कामे तातडीने हाती घेऊन ती जलदगतीने पूर्ण केली जाणार आहेत.

युवा नेते ऋषिकेश वाघेरे यांच्याकडून या पुलाच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. यावेळी त्यांनी सुरू असलेल्या कामाचा आढावा घेताना या पुलासाठी भूतकाळात झालेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची आठवण करून दिली. ऋषिकेश वाघेरे म्हणाले, “या परिसरातील रेल्वे फाटक कायमचे बंद व्हावे आणि नागरिकांची कोंडीतून सुटका व्हावी, यासाठी माजी महापौर कै. भिकू वाघेरे पाटील यांच्यापासून सातत्याने प्रयत्न सुरू होते.

त्यानंतर माजी महापौर संजोग वाघेरे पाटील आणि स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा उषा वाघेरे पाटील यांनीही यासाठी मोठा पाठपुरावा केला. हा संपूर्ण भाग केंद्र सरकारच्या रेल्वे विभाग व संरक्षण विभागाशी संबधित असल्यामुळे त्यामध्ये अनंत अडचणी येत होत्या. परंतु, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारचे नागरिकांच्या भेडसवणा-या समस्या मार्गी लावणे, त्या निकाली काढणे आणि विकास सर्वांपर्यंत पोहोचविणे, हे धोरण आहे.

या धोरणामुळे संरक्षण मंत्रालयाच्या आवश्यक त्या परवानग्या मिळाल्यामुळे या कामाला खरी गती मिळाली. आज हा पूल पूर्णत्वाकडे जात असून, आतापर्यंत सर्वांनी केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांना मोठे यश आले आहे.”

> “पिंपळे सौदागर, रहाटणी आणि पिंपरी कॅम्प या गजबजलेल्या परिसरातून पुणे-मुंबई महामार्गाकडे जाण्यासाठी ‘डेअरी फार्म मार्ग’ हा अत्यंत महत्त्वाचा आणि मुख्य दुवा मानला जातो. मात्र, या मार्गावर रेल्वे फाटक असल्यामुळे दररोज हजारो वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत होत्या. दिवसातून अनेकदा फाटक बंद होत असल्याने वाहनचालकांना तासनतास ताटकळत राहावे लागत होते. या रोजच्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांचा वेळ आणि महागडे इंधन मोठ्या प्रमाणावर वाया जात होते. आता हा उड्डाणपूल झाल्यानंतर वाहतुकीचा प्रवाह थेट आणि अखंड राहणार असून, परिसरातील कोंडी इतिहासजमा होणार आहे”.
>
> **– ऋषिकेश संजोग वाघेरे, युवा नेते**

## आरक्षण उप वर्गीकरणाला परिषदेचा विरोध - अ‍ॅड. जयदेव गायकवाड

### वर्गीकरणाच्या नावाखाली वाद निर्माण केले जात आहेत - अ‍ॅड. जयदेव गायकवाड

पिंपरी (दै. संध्या)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संसदेच्या सभागृहावर मोठे प्रभुत्व निर्माण केले होते, ते प्रज्ञा आणि ज्ञानामुळे. या देशाच्या सर्व समाजाची पुनर्रचना करण्याचे काम डॉ. आंबेडकरांनी केले. ज्ञान आणि शिक्षणाचे महत्व २०० वर्षांपूर्वी महात्मा जोतीराव फुले यांनी सांगितले. मुक्ता साळवे सारखी महिला ज्ञानामुळेच ब्रिटिशांशी लढली. आपण जातींच्या पलीकडे विचार केला पाहिजे. या देशाला राष्ट्र म्हणून निर्माण करताना समतेचे तत्व अंगीकारून पहिल्या जाती नष्ट केल्या पाहिजेत. यामुळेच विषमता नष्ट होईल. सध्या मात्र मागासवर्गीयांच्या आरक्षण उपवर्गीकरणाच्या नावाखाली जाती जातींमध्ये वाद निर्माण केले




जात आहेत. बहुतांश समाजाचा याला विरोध असताना सर्वोच्च न्यायालयाच्या जजमेंटच्या आधारे क्रिमिलेयरची अट लादण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे. यामुळे मागासवर्गीय समाजामध्ये वाद निर्माण होऊन फूट पडेल. याला आरक्षण उप वर्गीकरण परिषदेचा विरोध आहे असे स्पष्ट मत माजी आमदार व जेष्ठ नेते अ‍ॅड. जयदेव गायकवाड यांनी व्यक्त केले.

चिंचवड येथे आयोजित केलेल्या आरक्षण उप वर्गीकरण विरोधी परिषदेत अ‍ॅड. गायकवाड बोलत होते. यावेळी नगरसेवक डॉ. सुहास कांबळे, ज्येष्ठ नेते मानव कांबळे, अ‍ॅड. विवेक भाई चव्हाण (कोब्रा), वसंत दादा साळवी, अ‍ॅड. अंबादास बनसोडे, प्रा. केशव वाघमारे, बाळासाहेब भागवत, देवेंद्र तायडे, कपिल सरोदे, अ‍ॅड. अरविंद तायडे, विवेक बनसोडे, सुरेश निकाळजे, बापू गायकवाड आदींनी या कार्यक्रमात सहभागी होऊन मार्गदर्शन केले.

मुख्य आयोजक म्हणून ईश्वर कांबळे, अ‍ॅड. मिलिंद कांबळे, राहुल सोनवणे, ईश्वर कांबळे, नितीन कांबळे, प्रकाश बुक्कर, विनोद सरोदे, अ‍ॅड. नीलध्वज माने, प्रमोद क्षीरसागर, सुरेश गायकवाड, विकास साळवे यांनी सहभाग घेतला होता.

अ‍ॅड. जयदेव गायकवाड यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान लिहिताना 'बॅकवर्ड' (मागासलेला समाज) या शब्दाची व्याख्या केलेली नाही. का तर प्रत्येक राज्यात वेग वेगळा समाज बॅकवर्ड असू शकतो, त्यांना बॅकवर्ड ठरवणे हा त्या त्या राज्य सरकारचा अधिकार आहे. महाराष्ट्रात ५९ जाती बॅकवर्ड आहेत इतर राज्यात हा आकडा व जाती वेग वेगळ्या असतील. केवळ एका जातीच्या मागणीवरून आरक्षणाचे उपवर्गीकरण करणे याला आमचा तीव्र विरोध असल्याचे अ‍ॅड. जयदेव गायकवाड यांनी सांगितले.

## ‘अप्पूघर’ नव्या रूपात सजणार, चेहरा मोहरा बदलणार

पिंपरी (दै. संध्या)

■ राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक प्रमोद कुटे यांच्या पाठपुराव्याला यश

पिंपरी-चिंचवडसह पुणे जिल्ह्यातील मध्यवर्गीय नागरिकांचे पर्यटनाचे आकर्षण असलेले निगडीतील अप्पूघरचा कायापालट होणार आहे. अप्पूघर नव्या रुपात सजणार असून त्याचा चेहरा मोहरा बदलणार आहे. यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक प्रमोद कुटे यांनी सर्वसाधारण सभेत आवाज उठवला होता. त्यानंतर प्रशासनाने अप्पूघरचे नुतनीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. नगरसेवक प्रमोद कुटे म्हणाले, एकेकाळी पुण्यामध्ये सारसबाग आणि पिंपरी-चिंचवडमध्ये अप्पूघर हे सामान्य माध्यमवर्गीय नागरिकांचे फिरण्याचे आवडीचे ठिकाण होते. पिंपरी-चिंचवड शहराचा झपाट्याने विकास, कायापालट होत असताना अप्पूघरची अवस्था मात्र अत्यंत दयनीय झाली आहे. अप्पूघर हे सर्वसामान्यांसाठी पर्यटनाचे एक महत्त्वाचे केंद्र आहे. सध्याच्या महागड्या अम्युझमेंट पार्क्सच्या तुलनेत अप्पू घराचे तिकीट दर अत्यंत कमी आहेत. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून या ठिकाणी विशेष बदल झाले नव्हते. आता तेथील राईड्स आणि सुखसोयींचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. यासाठी महापालिका सर्वसाधारण सभेत सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. त्यानुसार अप्पू घरासाठी २०३१ पर्यंत संबंधित कंत्राटदाराबरोबर करार करण्यात आला आहे.

## पिंपळे गुरव बीआरटीएस मार्गावरील सुरक्षा केबिन ठरली अडथळा

पिंपळे गुरव (दै. संध्या)

कल्पतरू बीआरटीएस मार्गालगत पदपथावर उभारण्यात आलेली वाहतूक सुरक्षारक्षकांची केबिन सध्या प्रशासकीय दुर्लक्षाचे प्रतीक बनली आहे. ही केबिन पादचाऱ्यांसाठी मोठा अडथळा ठरत आहे. एकेकाळी बीआरटीएस मार्गावरील वाहतुकीचे नियमन करण्यासाठी सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांच्या कामकाजासाठी लाखो रुपये खर्च करून ही केबिन उभारण्यात आली होती. मात्र, आज या मार्गावर सुरक्षारक्षक कुठेही कार्यरत दिसत नसल्याने ही केबिन केवळ अडगळ ठरत आहे. महापालिकेच्या सार्वजनिक निधीतून उभारण्यात आलेली ही केबिन सध्या पदपथाच्या मध्यभागी उभी असल्याने नागरिकांना चालण्यासाठी उपलब्ध असलेली जागा कमी झाली आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती, महिला आणि विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. पदपथावरील अडथळ्यामुळे अनेकांना थेट वाहनांच्या वर्दळीच्या रस्त्यावरून चालावे लागत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनाही या परिस्थितीचा फटका बसत आहे. सुरक्षेसाठी उभारण्यात आलेली ही केबिन आज सुरक्षेलाच धोका निर्माण करत असल्याचे चित्र आहे. वापर शून्य असलेल्या या केबिनमुळे नागरिकांची गैरसोय शंभर टक्के होत असल्याची भावना परिसरातील रहिवाशांनी व्यक्त केली आहे. जेथे सुरक्षारक्षकच नाहीत, तेथे ही केबिन कशासाठी ठेवली आहे? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत. गंभीर बाब म्हणजे देखभालीअभावी केबिनच्या परिसरात अस्वच्छता वाढत असून, कचरा साचत आहे.

## वडाच्या मृत फांदीऐवजी जिवंत वृक्ष लागवडीतूनच खरी पूजा

पिंपरी (दै. संध्या)

हिंदू संस्कृतीतील प्रत्येक सण निसर्गाशी घट्ट जोडलेला असून, सण साजरा करताना पर्यावरण संवर्धनाची जाणीव ठेवणे काळाची गरज आहे. वडाच्या मृत फांदीची पूजा करण्यापेक्षा प्रत्यक्ष वडाचे झाड लावून त्याचे संगोपन करणे हीच खरी पूजा आहे, असे प्रतिपादन पुणे महापालिकेच्या महापौर मंजुषा नागपुरे यांनी केले.

वृक्षदायी प्रतिष्ठान, श्रीक्षेत्र देहू यांच्या वतीने ‘निर्मल वारी, हरित वारी’ अभियानांतर्गत वटपौर्णिमेनिमित्त आयोजित वटवृक्ष लागवड व पूजन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर (पिंपरी-चिंचवड), पोलिस उपायुक्त श्वेता वानखेडे (परिमंडळ ४), तसेच कार्यक्रमाच्या स्वागताध्यक्षा सारिका शेळके यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

पाटील म्हणाल्या, “पाडव्याला कडुलिंबाची पूजा करण्याऐवजी त्याची लागवड करून संवर्धन केले



महापौर मंजुषा नागपुरे

पाहिजे. बुद्ध पौर्णिमेला पिंपळाची पूजा केली जाते, त्याचप्रमाणे वटपौर्णिमेलाही वडाच्या झाडांची लागवड करून पर्यावरण जपण्याचा संदेश समाजात पोहोचवणे आवश्यक आहे.

जगद्गुरू अभंग गाथावन येथे वृक्षदायी प्रतिष्ठानने सुमारे दहा एकर परिसरात संत तुकाराम महाराजांच्या ४५३८ अभंगाइतकीच देशी वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन केले आहे. या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करताना उपस्थित मान्यवरांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक महापौर नागपुरे यांनी केले.

या प्रसंगी ह.भ.प. बाळासाहेब काशीद, ह.भ.प. शिवाजी महाराज मोरे, अ‍ॅड. कैलास पानसरे, पुरुषोत्तम महाराज मोरे, माणिक महाराज मोरे, नगराध्यक्षा पूजा दिवटे, उपनगराध्यक्षा प्रियांका मोरे, नगरसेविका रसिका काळोखे, शीतल हगवणे, पूनम काळोखे, ज्योती टिळेकर, माजी नगराध्यक्षा स्मिता चव्हाण, कार्यालयीन अधीक्षक प्रियांका कदम आदींसह विविध मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष शिवाजी महाराज मोरे यांनी ‘अभंग गाथावन’ संकल्पना उभी केली असून, संतांच्या नावाने राज्यभर ‘ज्ञानेश्वरी वन’, ‘अभंग गाथावन’ यांसारखे उपक्रम राबवण्याची गरज असल्याचे मत सोलापूरच्या उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते विविध देशी वृक्षांची लागवड करून पूजन करण्यात आले. वटपौर्णिमा उत्साहात साजरी झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विकास कंद यांनी केले, तर आभार प्रदर्शन नगराध्यक्षा पूजा दिवटे यांनी केले.

## एमएसएमई महोत्सवाला भरघोस प्रतिसाद

पिंपरी (दै. संध्या)

निगडी येथील आयसीएआय पिं.चिं शाखेच्या वतीने आणि ब्ल्यूमार्क सॉफ्टवेअरच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या माध्यम, लघु,सूक्ष्म (एमएसएमई) महोत्सवाला उद्योजकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी ब्ल्यूमार्क सॉफ्टवेअरचे संचालक संजय लांडगे,आयसीएआय पिं- चिं शाखाध्यक्ष सीए महावीर अशोकलाल कोठारी, माजी अध्यक्ष सुहास गार्डी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सीए महेश्वर मराठे, पंकज दारा, ब्ल्यूमार्क सॉफ्टवेअरचे संजय लांडगे यांनी मार्गदर्शन केले.




श्री.लांडगे म्हणाले कि, डिजिटल युगात व्यवसाय वृद्धीसाठी केवळ उत्तम उत्पादनच नव्हे, तर प्रभावी नेटवर्किंगचीही अत्यंत गरज आहे. ही गरज ओळखून 'ब्लूमार्क सॉफ्टवेअर'ने विकसित केलेले 'एक्स्पान्स' हे बी-टू-बी नेटवर्किंग अ‍ॅप एमएसएमई (MSME) उद्योजकांसाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरत आहे. उत्पादक, सेवा पुरवठादार आणि व्यावसायिक यांना एकाच डिजिटल व्यासपीठावर आणणाऱ्या या अ‍ॅपद्वारे व्यवसाय विस्तार, नवीन संपर्क आणि ग्राहक शोधणे सुलभ झाले आहे.

या प्लॅटफॉर्मवर व्यवसाय प्रोफाइल, थेट प्रचार, लीड जनरेशन आणि विश्लेषणासारख्या सुविधा उपलब्ध असून, सध्या २० हजारांहून अधिक नोंदणीकृत वापरकर्ते याचा लाभ घेत आहेत. इच्छुकांनी अधिक माहितीसाठी 9766120836 यावर संपर्क करावा.असे अवाहन केले.

> अध्यक्ष कोठारी यांनी प्रास्ताविकामध्ये म्हणाले कि, एमएसएमई हा दिन देशातील सर्व सीए शाखेवर साजरा करण्यात आला. यामुळे उद्योजकांना अनुदान, सरकारी योजना, कर्ज,कुशल कामगार, भागभांडवल या विषयावर केलेले मार्गदर्शन हे नक्कीच लाभदायी ठरणार आहे.

## मालमत्ताकर सवलतीची आज शेवटची संधी; १ जुलैपासून जप्ती मोहीम सुरू

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या करसंकलन विभागामार्फत मालमत्ताकरावर दहा टक्के सवलतची मुदत मंगळवार (दि.30) पर्यंत आहे. शेवटचा दिवस शिल्लक असल्याने नागरिकांनी मालमत्ताकर भरून सवलतीचा लाभ घ्यावा. एक जुलैपासून थकबाकीदारांवर कारवाई मोहीम सुरू करण्यात येणार आहे, असे उपायुक्त सचिन पवार यांनी सांगितले. शहरातील 7 लाख 44 हजार मालमत्ताधारकांपैकी आतापर्यंत 4 लाख 15 हजार जणांनी एकूण 483 कोटी रुपयांचा कर भरला आहे. सुमारे 3 लाख 46 हजार मालमत्ताधारकांनी ऑनलाईन पद्धतीने कर भरून 10 टक्के सवलत योजनेचा लाभ घेतला आहे.



सवलत योजना संपल्यानंतर 1 जुलैपासून करवसुली मोहीम अधिक तीव्र केली जाणार आहे. थकीत कर वसूल करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. वारंवार आवाहन करून तसेच, जप्तीच्या नोटिसा बजावूनही कर न भरणाऱ्या थकबाकीदारांविरुद्ध जप्तीची कारवाई करण्यात येणार आहे, असे उपायुक्त पवार यांनी स्पष्ट केले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### रोटरी क्लब ऑफ भिगवणच्या अध्यक्षपदी प्रविण वाघ तर सचिवपदी डॉ. प्रशांत चवरे




भिगवण (दैनिक संध्या) : रोटरी क्लब ऑफ भिगवण २०२६-२७ च्या अध्यक्षपदी प्रविण वाघ आणि सचिवपदी डॉ. प्रशांत चवरे तसेच उपाध्यक्षपदी मयुरेश रायसोनी व खजिनदारपदी संजय चौधरी यांची निवड करण्यात आली. क्लबचे संस्थापक अध्यक्ष सचिन बोगावत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली. या बैठकीत रियाज शेख, संपत बंडगर, संतोष सवाने,नामदेव कुदळे, संजय खाडे, कुलदीपक ननवरे, औदुंबर हुलगे, किरण रायसोनी, धनेन्द्र गांधी, आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलताना अध्यक्ष प्रविण वाघ म्हणाले की, येणाऱ्या वर्षात रोटरी क्लब तर्फे सर्वांना बरोबर घेऊन विविध सामजिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक क्षेत्रात कामे करण्यावर भर दिला जाईल.



### सामाजिक समस्या व कौटुंबिक कलह समुपदेशन केंद्राचे उद्घाटन संपन्न

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : महाराष्ट्र लेवा पाटीदार महासंघाद्वारे संचलित, सामाजिक समस्या व कौटुंबिक कलह समुपदेशन केंद्र, पुणेचे उदघाटन, महासंघ अध्यक्ष अरुण बोरोले यांच्या शुभहस्ते करण्यात आले. परमपूज्य पितामह भीष्माचार्य ज्येष्ठ नागरिक संघ, सुदर्शन नगर, गल्ली न. ३, पिंपळे गुरव, पुणे येथे संपन्न झाले. त्यावेळी समाजातील निवडक कार्यकर्ते व बांधव आणि भगिनी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी मा.न्यायाधीश संजय पाटील, (निवृत्त), डॉ. दिनेश नेहेते, निवृत्त शास्त्रज्ञ महेश ढाके, डॉ. अमोल जवळे, रमेश वारके, निवृत्त व्हीपी, प्रतिभा राणे, पायल चौधरी, विभावरी इंगळे, किरण पाचपांडे, विजया जंगले, कृष्णाजी खडसे, विकास वारके, ज्येष्ठ समाजसेवक, प्रवचनकार डॉ. रविंद्र भोळे, डॉ. दिनेश नेहेते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पायल चौधरी यांनी केले. शेवटी दिलीप चौधरी यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.



### टोमॅटोला भाव नसल्याने शेतकरी संकटात

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यात यंदा हवामान पोषक असल्याने टोमॅटोचे विक्रमी उत्पादन झाले आहे. मात्र, बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर आवक वाढल्यामुळे टोमॅटोचे दर कवडीमोल झाले असून, शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. हंगामाच्या सुरुवातीला टोमॅटोला प्रति क्रेट ९०० रुपये इतका चांगला दर मिळत होता. यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते.सध्या हा दर थेट १५० ते ३०० रुपयांपर्यंत खाली आला आहे. अचानक झालेल्या या घसरणीमुळे उत्पादन खर्च निघणेही कठीण झाले आहे. एकरी साधारण दीड लाख रुपयांपर्यंत खर्च येतो. यात मशागत,बेड तयार करणे, मल्चिंग ड्रीप, रोपे, लागवड,मांडव उभारणी, बांधणी ,खते ,औषधे फवारणी, तोडणी, वाहतूक आणि मजुरीचा समावेश असतो. सध्या मिळत असलेला दर हा खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. यंदा शेतकऱ्यांनी साऊ , अथर्व आणि ६२४२ यांसारख्या सुधारित जातींची मोठ्या प्रमाणावर लागवड केली होती, ज्यामुळे उत्पादनात लक्षणीय वाढ झाली. बाजारपेठेतील दर स्थिर राहण्यासाठी प्रशासनाने हस्तक्षेप करावा आणि साठवणुकीसाठी शीतगृहांची सोय उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी जुन्नरमधील शेतकरी करत आहेत.




### नारायणगाव येथे तिहेरी गाड्यांचा भीषण अपघात

नारायणगाव (दैनिक संध्या) : पुणे नाशिक महामार्गावरील नारायणगाव बायपास येथे कोठारी मारुती शोरूम समोर रविवारी रात्री भरधाव फिगो कारचे नियंत्रण सुटल्याने तिहेरी वाहनांमध्ये झालेल्या भीषण अपघातात गोळेगाव ता.जुन्नर येथील एका तरुणाचा मृत्यू झाला, तर त्याच्या पत्नीसह इतर सात जण जखमी झाले.हा अपघात सायंकाळी सातच्या सुमारास मुसळधार पावसात घडला. जखमींवर नारायणगाव येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती नारायणगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सपांगे यांनी दिली. या अपघातात संजय लिंबाजी खंडागळे वय 25 रा.गोळेगाव ता. जुन्नर यांचा मृत्यू झाला, तर त्याची पत्नी कीर्ती संजय खंडागळे वय 19 रा.गोळेगाव यांच्यासह सात जण जखमी झाले आहेत. जखमींमध्ये अझरुद्दीन काझी (चालक), माया नामदेव कदम वय 58, ऋषिकेश नामदेव कदम वय 30, नामदेव भिवाजी कदम वय 59, ऋतिका नामदेव कदम वय 28 आणि रुचिका ऋषिकेश कदम वय 27 यांचा समावेश असून सर्वजण डीएसपी चौक, अहिल्यानगर येथील रहिवासी आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार संजय खंडागळे हे पत्नीसह मोटारीने नारायणगावहून मंचरच्या दिशेने जात होते. दरम्यान, मुसळधार पावसामुळे महामार्गावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. साचलेल्या पाण्याच्या प्रवाहामुळे मोटारीवरील नियंत्रण सुटल्याने वाहन प्रथम दुभाजकाला धडकले. त्यानंतर मोटार विरुद्ध दिशेच्या मार्गावर गेली आणि पुण्याकडून नारायणगावच्या दिशेने येणाऱ्या दोन वाहनांना जोरदार धडकली. या अपघातात पुण्याहून अहिल्यानगरकडे निघालेल्या एका इर्टिगा कारमधील चालकासह एकाच कुटुंबातील पाच जण जखमी झाले. अपघातानंतर काही काळ घटनास्थळी गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. या अपघातामुळे पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतूक सुमारे अर्धा तास विस्कळीत झाली होती. अपघाताची माहिती मिळतातच नारायणगावचे उपसरपंच बाबू पाटे, सुरज वाजगे, जुबेर आतार ,विकास तोडकरी, अश्फाक पटेल,रोहन वाजगे,अनिकेत डोंगरे तसेच नारायणगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सपांगे ,हवालदार मंगेश लोखंडे, सत्यम केळकर, सोमनाथ डोके तसेच पोलीस पाटील सुशांत भुजबळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी स्थानिकांच्या मदतीने जखमींना तातडीने बाहेर काढून उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल केले. या प्रकरणी नारायणगाव पोलीस पुढील तपास करत आहे. दरम्यान अपघातात मृत्यू झालेला संजय खंडागळे हा पुणे येथे आयटी इंजिनिअर म्हणून काम करत होता. दोन दिवसापूर्वी सुट्टी म्हणून गावी आला होता आणि आज चार वाजता घरून पुन्हा पुण्याला जात असताना पुणे नाशिक महामार्गावर मारुती शोरूम जवळ काळाने त्याच्यावर झडप घातली.

# गुटखा, दारू, ताडी व मटका जोमात

**कारवाई कधी होणार याकडे नागरिकांचे लक्ष**



उरुळी कांचन (दै. संध्या)

हवेली तालुक्यातील उरुळी कांचन परिसरात पुन्हा एकदा अवैध धंद्यांनी डोके वर काढल्याचे चित्र दिसून येत असून, गुटखा, अवैध दारू, ताडी तसेच मटका व्यवसाय लपून-छपून सुरू असल्याची समोर येत असुन नागरिकांमध्ये चांगलीच चर्चा रंगत आहे. महिनाभरापूर्वी पुणे येथे विषारी हातभट्टीची दारू पिल्याने २० ते २२ जणांचा मृत्यू झाल्याच्या गंभीर घटनेनंतर प्रशासनाने उरुळी कांचन परिसरातील अवैध धंद्यांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करून त्यांना आळा घातला होता. मात्र, काही दिवस उलटताच हे धंदे पुन्हा सुरू झाले असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. परिसरातील विविध भागांत दारूच्या रिकाम्या बाटल्या, हातभट्टी दारू व ताडीसाठी वापरण्यात येणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांचा खच आढळून येत असल्याने अवैध विक्री सुरू असल्याचा संशय अधिक बळावत आहे. त्यामुळे हे धंदे पुन्हा कोणाच्या आशीर्वादाने सुरू झाले, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. राज्यात गुटखाबंदी लागू असतानाही उरुळी कांचनमधील काही टपऱ्या, किराणा दुकाने तसेच फळविक्रीच्या आड़ून गुटखा सहज उपलब्ध होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे, महिनाभरापूर्वीच्या तुलनेत दोन ते तीनपट अधिक दराने गुटखा विकला जात असल्याने काळाबाजाराचे मोठे जाळे कार्यरत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

"गुटखा बंदी असताना एवढ्या मोठ्या प्रमाणात गुटखा येतो तरी कुठून? त्याचा पुरवठादार कोण? वाहतूक कशी होते? आणि यामागे कोणाचे संरक्षण आहे?" असे अनेक प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

उरुळी कांचनमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या कार्यकाळात, डॉ. मणीभाई देसाई यांच्या प्रयत्नातून १९६९ साली ग्रामपंचायत हद्दीत दारूबंदीचा ठराव शासनाकडून मंजूर करण्यात आला होता. मात्र, सध्याच्या परिस्थितीत दारूबंदीचा नियम केवळ कागदोपत्रीच राहिला असून प्रत्यक्षात अनेक ठिकाणी छुप्या पद्धतीने दारू विक्री सुरू असल्याचा आरोप होत आहे.

याशिवाय मटक्याचे अड्डेही पुन्हा सक्रिय झाल्याची चर्चा असून, अवैध धंद्यांच्या मागे मोठा 'आका' कोण आहे, या धंद्यांना पाठबळ कोणाचे आहे, याचा शोध घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

उरुळी कांचन परिसरात सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर पोलीस व संबंधित प्रशासनाने तातडीने कारवाई करून दारूबंदी आणि गुटखाबंदीची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.



## शिवराज्याभिषेक सोहळ्याने दुमदुमला चाकणचा संग्रामदुर्ग किल्ला

चाकण (दै. संध्या)

जय भवानी जय शिवाजी, शिवाजी महाराज की जय अशा गगनभेदी घोषणा देत चाकण येथे शिवराज्याभिषेक सोहळ्याने अवघा संग्राम किल्ला दुमदुमून गेला होता. किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे अध्यक्ष एड. किरण झिंजुरके यांच्या नेतृत्वाखाली चाकण येथील ऐतिहासिक संग्रामदुर्ग किल्ल्यात शिवराज्याभिषेक सोहळ्या निमित्त विविध अशा सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष राहुल वाडेकर, अॅड. किशोर झिंजुरके, सत्यवान तांबे, राजू दीक्षित, किशोर परदेशी, जितेंद्र येळवंडे, युवराज कड, भानुदास डोंगरे, मुरलीधर मंडलिक आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी वरील मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. अॅड. किरण झिंजुरके व विद्या झिंजुरके यांच्या हस्ते मूर्तीला अभिषेक करून महाआरती करण्यात आली. पारंपारिक वेशभूषा, ढोल ताशांच्या गजरात आणि जय भवानी, जय शिवरायच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. संग्राम दुर्ग किल्ल्यात शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त मोठ्या संख्येने शिवभक्त, तरुण कार्यकर्ते, तरुणी व आबालवृद्ध यांची तोबा गर्दी झाल्याने चाकणला जणू काही यात्रेचे स्वरूप आले होते.

## राजगुरुनगरात मुसळधार पावसाची जोरदार हजेरी

राजगुरुनगर (दै. संध्या)

**ओढे-नाल्यांना पूर, घर-दुकानांत पाणी शिरल्याने नागरिकांचे हाल**



मोठ्या प्रतीक्षेनंतर अखेर राजगुरुनगर शहरासह परिसरात रविवारी मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली. जोरदार पावसामुळे ओढे-नाले दुथडी भरून वाहू लागले, अनेक सखल भागांमध्ये पाणी साचल्याने जनजीवन विस्कळीत झाले.तर अनेक ठिकाणी घरांमध्ये तसेच व्यावसायिक दुकानांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून घरातील जीवनावश्यक वस्तू, इतर साहित्य भिजल्याने नागरिकांना मोठा फटका बसला. खेड तालुक्यात उशिरा परंतु जोरदार पावसाने शेतकरी बांधवांमध्ये समाधानाची भावना उमटली परंतु शहरी भागात अनेक ठिकाणी पाण्याचे तळे साचून तळातील दुकानात , मोठ्या प्रमाणात पाणी शिरल्याने नगरपरिषदेच्या पावसाळा पूर्व नाले सफाईची कामाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.पावसाळ्यापूर्वी संबंधित विभागाने गटारींची स्वच्छता, दुरुस्ती आणि पाणी निचऱ्याची योग्य व्यवस्था करणे अपेक्षित होते. मात्र नगरपरिषदेच्या दुर्लक्षामुळे अनेक भागांतील समस्या कायम राहिल्याने नागरिकांनी प्रशासनावर नाराजी व्यक्त केली आहे.

## पर्यावरण संवर्धनासाठी वडगाव आनंद शाळेत ३ हजार वृक्षांची लागवड

नारायणगाव (दै. संध्या)



पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील वडगाव आनंद येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या परिसरात एक कौतुकास्पद पर्यावरणपूरक उपक्रम राबवण्यात आला आहे. मुंबई येथील 'एम्पथी फाउंडेशन'च्या विशेष सहकार्याने शाळेच्या आवारात 'मियावाकी' या जपानी पद्धतीने तब्बल ३ हजार वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.

एम्पथी फाउंडेशनने २०१३ मध्ये या शाळेच्या इमारतीचे बांधकाम केले होते. त्यानंतर आता सुमारे १५ लाख रुपये खर्च करून या महत्त्वपूर्ण वृक्षलागवड प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. जपानी तंत्रज्ञानावर आधारित या प्रकल्पामुळे शाळेच्या परिसरात अल्पावधीतच 'मिनी जंगल' साकारले आहे.शाळेच्या मोकळ्या जागेत दाट पद्धतीने वृक्षारोपण करण्यात आले. या जपानी तंत्रज्ञानामुळे कमी जागेत अनेक प्रकारची झाडे अत्यंत दाट पद्धतीने लावली जातात. यामुळे झाडे सूर्यप्रकाशासाठी एकमेकांशी स्पर्धा करतात आणि त्यांची वाढ पद्धतीपेक्षा दहा पटीने जलद गतीने होते. या झाडांचे संगोपन व संवर्धन फाउंडेशनमार्फत नियुक्त ठेकेदाराकडून केले जाईल, तर शाळा प्रशासन पाणी व इतर तांत्रिक सहकार्य करणार आहे.

विद्यार्थ्यांना मिळेल निसर्गाची शाळा या उपक्रमामुळे शाळेच्या परिसरातील ऑक्सिजनचे प्रमाण वाढून वातावरण निरोगी होण्यास मदत होईल. तसेच, विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रत्यक्ष निसर्गाच्या सान्निध्यात राहून पर्यावरणाचे धडे गिरवता येणार आहेत. या उपक्रमाचा मुख्य उद्देश भविष्यात पर्यावरणाचे रक्षण करणे आणि विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच निसर्गाशी जोडणे हा आहे.

या उपक्रमासाठी जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आणि गटविकास अधिकारी प्रतीक चन्नावर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले, तर गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे यांनी सहकार्य केले. सामाजिक कार्यकर्ते डी. बी. वाळूंज आणि शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय चौगुले पाटील यांनी या प्रकल्पासाठी पुढाकार घेतला होता.

या प्रकल्पाच्या यशस्वीतेसाठी एम्पथी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुंदरेश्वरन, प्रकल्प व्यवस्थापक दिनेश जोरे आणि वृक्षलागवडीचे तांत्रिक काम पाहणारे राजकुमार दिवाकर यांनी विशेष मेहनत घेतली. तसेच मुख्याध्यापक सुनील ठिकेकर, सहशिक्षिका छाया डुंबरे, सविता खेत्री, गीता बोऱ्हाडे, सुनंदा तांबे यांनी या उपक्रमासाठी परिश्रम घेतले. या अभिनव प्रकल्पाचे सर्वत्र कौतुक होत असून सरपंच रेलिका जाधव, उपसरपंच गणेश भुजबळ, ग्रामपंचायतीचे सदस्य आणि ग्रामविकास अधिकारी ज्ञानेश्वर मुकणे यांनी या उपक्रमाचे स्वागत केले आहे.

## ओतूरमध्ये घनकचरा व्यवस्थापनाचा बोजवारा

नारायणगाव (दै. संध्या)



जुन्नर तालुक्यातील ऐतिहासिक आणि धार्मिक वारसा लाभलेल्या ओतूर गावातील घनकचऱ्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. प्रशासनाच्या योग्य नियोजनाअभावी गावात ठिकठिकाणी कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले असून, गावाला आता 'कचऱ्याचे गाव' अशी नवी ओळख मिळण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

श्री सद्गुरु बाबाजी चैतन्य महाराजांचे संजीवन समाधीस्थळ, श्री कपर्दिकेश्वर महादेव मंदिर आणि संस्कारांचा ठेवा अशी ओतूरची ओळख आहे. मात्र, गावात वाढत चाललेल्या अस्वच्छतेमुळे गावातील धार्मिक आणि सांस्कृतिक प्रतिमेला मोठा तडा जात आहे.

ग्रामपंचायतीसमोर गेल्या काही वर्षांपासून कचऱ्याची विल्हेवाट लावणे हा एक मोठा प्रश्न बनला आहे. रोज गोळा होणारा टनभर कचरा नेमका कुठे टाकायचा, याचे कोणतेही ठोस नियोजन प्रशासनाकडे नाही. प्रशासनाने यापूर्वी कचरा टाकण्यासाठी काही जागा शोधण्याचा प्रयत्न केला होता, मात्र स्थानिक शेतकऱ्यांच्या तीव्र विरोधामुळे ते प्रयत्न अयशस्वी ठरले. विशेष म्हणजे गावाची स्वतःची मालकीची मोठी जागा उपलब्ध आहे. परंतु, केवळ व्यवस्थापन आणि योग्य नियोजनाअभावी कचऱ्याचे मोठे ढीग गावाच्या मुख्य प्रवेशद्वारावर आणि दारात साचले आहेत.

ठिकठिकाणी साचलेल्या या सडणाऱ्या कचऱ्यामुळे संपूर्ण परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली आहे. डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने गावात साथीचे आजार पसरण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. एकेकाळी तालुक्यात अग्रगण्य असणारे ओतूर गाव आज मूलभूत सोयीसुविधांसाठी झगडत आहे.

> गावाकडून मोठा महसूल मिळत असतानाही प्रशासन हा कचऱ्याचा प्रश्न का सोडवू शकत नाही, असा संतप्त सवाल ग्रामस्थ विचारत आहेत. या समस्येवर गावातील सामाजिक संघटना, ग्रामपंचायत आणि प्रशासनाने एकत्र येऊन तातडीने तोडगा काढावा, अशी मागणी आता ग्रामस्थ करत आहे.

## मनसेच्यावतीने ३७० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

जेजुरी (दै. संध्या)

पुरंदर तालुका मनसेचे अध्यक्ष उमेश जगताप यांच्या वतीने कोथळे येथील विद्या महामंडळ प्रशालेतील 370 विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. शैक्षणिक वर्ष सुरू झाल्याने शैक्षणिक साहित्यापासून ग्रामीण भागातील विद्यार्थी वंचित राहू नये याकरिता गेली 20 वर्षे मनसेच्या वतीने उमेश जगताप यांच्या पुढाकारातून शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येते. शैक्षणिक साहित्य वाटप प्रसंगी उमेश जगताप,श्री मल्हार शिक्षण मंडळाचे अध्यक्ष वीजय जगताप, सचिव प्रमोद जगताप सहसचिव, राजेंद्र जगताप खजिनदार तुषार खैरे , उपाध्यक्ष पोपट भोसले, संचालक अॅड धनंजय भोईटे, सतीश शिंदे, मुख्याध्यापक प्रशांत कदम उपस्थित होते. मनसे अध्यक्ष उमेश जगताप यांच्या पुढाकारातून अनेक शाळांना शैक्षणिक साहित्य वाटप, जेजुरी शहरात पाणी टंचाई काळात टँकर द्वारे पाणी वाटप, आपत्कालीन काळात गरजू नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप, एक हजारहून अधिक अपघात ग्रस्तांना मदत, अन्यायग्रस्त नागरिकांसाठी आंदोलने आदी उपक्रम राबविण्यात आले आहेत.

शैक्षणिक साहित्य कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय घोगरे तर आभार किशोर भालेराव यांनी मानले.

# ‘कट्टा सोशल माध्यमांचा’ उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## वर्षभर माध्यमकर्मींसाठी होणार मोफत कार्यशाळांचे आयोजन

नारायणगाव (दै. संध्या)



राज्य मराठी पत्रकार परिषद महाराष्ट्र प्रदेश आणि जुन्नर इन्फ्लुएन्सर्स ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी विविध माध्यम क्षेत्रात कार्यरत असलेल्या नवोदित आणि अनुभवी माध्यमकर्मींसाठी “कट्टा सोशल माध्यमांचा” या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

माध्यम क्षेत्रातील बदलत्या प्रवाहाशी जुळवून घेताना पत्रकार, सोशल मीडिया क्रिएटर्स, युट्यूबर्स आणि डिजिटल माध्यमकर्मी यांना नव्या संधी आणि कौशल्यांचा परिचय करून देण्याच्या उद्देशाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. राज्य मराठी पत्रकार परिषदचे केंद्रीय संस्थापक अध्यक्ष मधुसूदन कुलथे आणि केंद्रीय समिती संचालक राजेंद्र बिर्ला यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम जुन्नर तालुक्यातील सावरगाव येथील अशोक ढमढेरे आणि शोभा ढमढेरे यांच्या वसुंधरा फार्म स्टे येथे निसर्गरम्य वातावरणात पार पडला.

शांत, प्रेरणादायी आणि अभ्यासपूर्ण वातावरणामुळे उपस्थित माध्यमकर्मींच्या चर्चांना अधिक सकारात्मक दिशा मिळाली.

कार्यक्रमाला राज्य मराठी पत्रकार परिषदेचे उपाध्यक्ष प्रवीण शिंदे, पुणे जिल्हा इलेक्ट्रॉनिक मीडियाचे अध्यक्ष रायचंद शिंदे, जुन्नर तालुका अध्यक्ष सचिन डेरे, कार्याध्यक्ष आयुब शेख, आंबेगाव तालुका अध्यक्ष नवीन सोनवणे, संघटक मंगेश कोकणे, दिनेश बाणखेले, ज्येष्ठ फोटोग्राफर शांताराम बामणे, संदीप उत्तर्डे, किरण साबळे, स्मिता शिंदे, भारती हांडे, किरण वाजगे, जगदीश ताजवे, जगदीश गुप्ता यांच्यासह विविध माध्यमांशी संबंधित प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी राज्य उपाध्यक्ष प्रवीण शिंदे यांनी राज्य पत्रकार परिषदेची ध्येय धोरने स्पष्ट केली.कार्यशाळे दरम्यान सोशल मीडिया आणि पत्रकारिता करताना येणाऱ्या अडचणी, माहितीची पडताळणी, बदलती डिजिटल माध्यमे, प्रेक्षकांशी संवादाचे तंत्र आणि व्यावसायिकता जपण्याचे महत्त्व यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. याशिवाय प्रभावी स्क्रिप्ट रायटिंग, मोबाईलद्वारे दर्जेदार व्हिडिओ शूटिंग, व्हिडिओग्राफीची आधुनिक तंत्रे, सोशल मीडिया ग्रोथ टिप्स, रील निर्मिती, कंटेंट प्लॅनिंग आणि डिजिटल माध्यमातील संधी याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.


या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ प्रशिक्षणापुरता मर्यादित न राहता पत्रकार, रील स्टार, युट्यूबर, निवेदक आणि कंटेंट क्रिएटर्स यांच्याशी थेट संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. तसेच प्रशासनातील अधिकाऱ्यांशी थेट संवादाचे व्यासपीठ निर्माण करण्याचाही मानस व्यक्त करण्यात आला.

"दर महिन्याच्या एका रविवारी अशा प्रकारे वर्षभरात एकूण १२ कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार असून राज्य मराठी पत्रकार परिषद महाराष्ट्र प्रदेशच्या सभासदांना या उपक्रमात पूर्णपणे मोफत सहभागी होता येणार असल्याची माहिती पुणे जिल्हा इलेक्ट्रॉनिक मीडियाचे अध्यक्ष रायचंद शिंदे यांनी दिली.

> कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ‘होम मिनिस्टर’ कार्यक्रमाचे निवेदक अभय वारुळे यांनी केले तर आभार प्रदर्शन आयुब शेख यांनी केले. कार्यक्रमानंतर उपस्थितांनी वसुंधरा फार्म स्टे येथे जुन्नरच्या खाद्यसंस्कृतीची ओळख असलेल्या मासवडी आणि शेंगळीच्या जेवणाचा आस्वाद घेत कार्यक्रमाची सांगता केली.




दैनिक
संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# थोडक्यात पण महत्वाचे



## टीईटी पेपरफुटी प्रकरणी भुसे यांची भूमिका स्पष्ट

मुंबई (दैनिक संध्या) : टीईटी पेपरफुटी प्रकरणाचा तपास विशेष तपास पथक (एसआयटी) मार्फत करण्यात येणार असून,या चौकशीतून आणखी महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता असल्याचे शालेय शिक्षणमंत्री ना.दादाजी भुसे यांनी माध्यमांसमोर स्पष्ट केले. परीक्षा परिषदेच्या माध्यमातून प्रश्नपत्रिकांची छपाई अत्यंत गोपनीय आणि सुरक्षित पद्धतीने केली जाते. पोलिसांनी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे वेळेत कारवाई करून हा गैरप्रकार उघडकीस आणला गेला.विशेष म्हणजे,घटना घडण्यापूर्वीच पोलिसांनी स्वतःहून केलेल्या या कारवाईमुळे मोठा गैरप्रकार टाळला गेला. राज्यातील आगामी सर्व परीक्षा पूर्णपणे पारदर्शक,निष्पक्ष आणि विश्वासार्ह पद्धतीने पार पाडण्यात येतील.परीक्षेच्या पवित्रतेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही,अशी सरकारची ठाम भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणात जो कोणी दोषी आढळेल,त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. आवश्यकता भासल्यास संबंधितांवर मोकोका अंतर्गतही कारवाई करण्यास सरकार मागेपुढे पाहणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## नागरिक, लघुउद्योजकांना अचूक माहितीचे आवाहन

मुंबई (दैनिक संध्या) : भारत सरकारच्या सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयामार्फत देशभरात PLFS (Periodic Labour Force Survey) आणि ASUSE (Annual Survey of Unincorporated Sector Enterprises) हे महत्वाचे सर्वेक्षण राबविण्यात येत असून, राज्यात प्रथमच अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, नियोजन विभागामार्फत ही दोन्ही सर्वेक्षण जिल्हानिहाय आकडेवारी मिळविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असल्याचे उपआयुक्त, जिल्हा सांख्यिकी कार्यालय,मुंबई उपनगर यांनी कळविले आहे. देश, राज्य आणि जिल्हास्तरावरील विकास नियोजन, रोजगारनिर्मिती, कौशल्य विकास, उद्योजकता प्रोत्साहन तसेच विविध लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी या सांख्यिकीय माहितीची आवश्यकता असते. शासनाच्या अनेक महत्त्वपूर्ण धोरणांचे नियोजन आणि मूल्यांकनही या सर्वेक्षणांतून प्राप्त होणाऱ्या माहितीच्या आधारे केले जाणार असल्याने माहितीचा दर्जा गुणवत्तापूर्ण असणे आवश्यक आहे. मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यांमध्ये माहिती संकलनासाठी अर्थ व सांख्यिकी आयुक्तालया अंतर्गत IPSOS Research Private Limited या संस्थेची निवड केली आहे. संस्थेचे अन्वेषक आणि पर्यवेक्षक निवडक नमुना पद्धतीने निवडलेल्या कुटुंबांच्या मुलाखती घेऊन विहित नमुन्यात माहिती संकलित करणार आहेत. सर्वेक्षणाचे काम निर्धारित कालावधीत पूर्ण व्हावे यासाठी अन्वेषक आणि पर्यवेक्षकांना रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही काम करण्यास परवानगी देण्यात आली आहे. सर्वेक्षणातून संकलित करण्यात येणारी माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल आणि तिचा वापर केवळ सांख्यिकीय उद्देशासाठीच केला जाईल.

## वस्तू व सेवा कर दिनानिमित्त एक जुलैला कार्यक्रम

मुंबई (दैनिक संध्या) : राज्य आणि केंद्र शासनाच्या वस्तू व सेवा कर विभागातर्फे रवींद्र नाट्य मंदिरात दुपारी दोन वाजता 'वस्तू व सेवा कर दिन' साजरा करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होईल. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुंबईच्या महापौर रीतू तावडे, लोकसभा सदस्य अनिल देसाई, विधानपरिषद सदस्य चित्रा वाघ, विधान परिषद सदस्य मनीषा कायंदे विधानसभा सदस्य महेश सावंत यावेळी उपस्थित राहणार आहेत. मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी आदी यावेळी उपस्थित असतील.

# मनमाडमध्ये उभारणार 'भीमसृष्टी'

### प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती देण्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचे निर्देश

■ मुंबई (दै. संध्या)




भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या मनमाडच्या ऐतिहासिक भूमीत त्यांच्या विचारांचे जतन आणि समाज परिवर्तनाच्या कार्याला प्रेरणा देणारी भव्य 'भीमसृष्टी' उभारण्यासाठी शासन सकारात्मक असून, हा प्रकल्प गुणवत्तापूर्ण आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जाईल, अशी ग्वाही सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिली. मनमाड येथील भीमसृष्टी उभारण्यासंदर्भात सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या शासकीय निवासस्थानी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रकल्पाच्या विविध पैलूंवर सविस्तर आणि सकारात्मक चर्चा करण्यात आली. यावेळी विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, सहसचिव सोमनाथ बागुल यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. सामाजिक न्याय मंत्री शिरसाट म्हणाले, मनमाड ही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी असून, त्यांच्या असंख्य आठवणी या ठिकाणी आहेत. त्या जपण्यासाठी तसेच बाबासाहेबांच्या विचारांचा आणि समाज परिवर्तनातील त्यांच्या महान कार्याचा गौरव करण्यासाठी शासन कटिबद्ध असून, 'भीमसृष्टी' प्रकल्पाच्या उभारणीबाबत शासनाची भूमिका सकारात्मक आहे. नाशिक जिल्ह्यातील मनमाड शहराला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याशी असलेला ऐतिहासिक आणि वैचारिक संबंध लक्षात घेऊन येथे भव्य 'भीमसृष्टी' उभारण्याची संकल्पना साकारण्यात येत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार, सामाजिक न्याय, समता आणि बंधुतेची मूल्ये पुढील पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रस्तावित प्रकल्पामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा, प्रेरणादायी स्मारक, भगवान गौतम बुद्ध स्मारक, अत्याधुनिक विपश्यना केंद्र, सभागृह, लँडस्केपिंग, पार्किंग तसेच नागरिकांसाठी विविध सुविधा उभारण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच बैठकीत प्रकल्पासाठी आवश्यक जागा, प्रशासकीय प्रक्रिया, निधी उपलब्धता आणि प्रभावी अंमलबजावणी यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांशी सविस्तर आढावा घेण्यात आला. हा प्रकल्प वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या कार्यवाहीला गती देण्याचे निर्देश मंत्री शिरसाट यांनी यावेळी दिले.

मनमाड नगर परिषद, लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभागांच्या समन्वयातून हा प्रकल्प साकारल्यास मनमाड हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे प्रेरणास्थान म्हणून विकसित होईल. तसेच सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात राज्यातील एक महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून उदयास येईल, असेही मंत्री शिरसाट यांनी यावेळी सांगितले.



# नसरापूर हत्या प्रकरणाच्या निकालावर उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले समाधान

■ मुंबई (दै. संध्या)

नसरापूर बालिका बलात्कार व हत्या प्रकरणात न्यायालयाने आरोपीला फाशीची शिक्षा सुनावली. या निकालावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाधान व्यक्त केले. न्यायालयाने आरोपीला फाशीची शिक्षा ठोठावल्याने महाराष्ट्र हे कायद्याचे राज्य आहे आणि इथे गुन्हेगारांना कोणतेही अभय नाही, असा इशारा उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिला. विधीमंडळाच्या आवारात त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, या निकालाने न्याय मिळाला असून, महिलांवर आणि बालिकांवर अत्याचार करणाऱ्यांना स्पष्ट इशारा आहे. यापुढे कुणी असे घृणास्पद कृत्य करण्यास धजावणार नाही, असा हा कडक इशारा आहे. अशा नराधमांना समाजात किंवा कायद्याच्या राज्यात कोणतीही जागा नाही. त्यांना जगण्याचा अधिकारच नाही! महिला, मुली आणि लहान बालिकांविरुद्ध होणाऱ्या अत्याचारांविरोधात महायुती सरकारची भूमिका सदैव कठोर राहिली आहे, असे ते म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य सरकारने महिलांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. प्रत्येक मुलगी आणि महिला सुरक्षित वातावरणात जगावी, यासाठी सरकार सातत्याने प्रभावी उपाययोजना राबवत आहे. जलद तपास, फास्ट ट्रॅक न्यायालयीन प्रक्रिया आणि कठोर शिक्षा यांसाठी सरकार कटिबद्ध आहे, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिली. नसरापूर प्रकरणात आज न्याय झाल्याची भावना सर्वांमध्ये निर्माण झाल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

# कर्जखात्याला 'आधार' संलग्न करावे सहकार विभागाचे आवाहन

■ मुंबई (दै. संध्या)

राज्य शासनाने राज्यातील बळीराजाला मोठा दिलासा देण्यासाठी घोषित केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती' अंमलबजावणी आता अंतिम टप्प्यात आहे. या योजनेचा थेट लाभ शेतकऱ्यांना लवकर मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी आपली आधार माहिती बँकेच्या शाखेत द्यावी असे आवाहन सहकार विभागाने केले आहे. आधार प्रमाणीकरण पूर्ण होताच, जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर लाभाची रक्कम जमा करण्याचे सहकार विभागाचे नियोजन आहे. या महत्त्वाकांक्षी योजनेमुळे महाराष्ट्रातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांची आर्थिक मदत मिळणार आहे. सहकार आयुक्त व निबंधक तसेच जिल्हा बॅंकर्स समितीकडून व्यापारी आणि सहकारी बँकांना पात्र शेतकऱ्यांचे आधार क्रमांक घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. योजनेच्या पारदर्शक अंमलबजावणीसाठी सर्व बँकांकडील पात्र शेतकऱ्यांची कर्ज खात्याची माहिती अपलोड झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांना स्वतंत्र विशिष्ट कर्ज खातेनिहाय नंबर दिला जाणार आहे. पात्र शेतकऱ्यांची यादी बँक शाखा, ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय आणि पोर्टलवर प्रसिद्ध केली जाणार आहे. आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून थेट संबंधित शेतकऱ्याच्या कर्जखात्यात लाभाची रक्कम जमा केली जाणार आहे. या योजनेचा लाभ मिळालेल्या शेकऱ्यांना चालू हंगामासाठी नव्याने कर्ज पुरवठा करण्याच्या सूचना सर्व बँकांना देण्यात आल्या आहेत.

# जायकवाडी प्रकल्पासह सिंचनविषयक विविध प्रस्तावांचा आढावा

■ मुंबई (दै. संध्या)



जायकवाडी प्रकल्पाच्या फेरनियोजनासह धरणात मत्स्यबीज सोडण्याचा प्रस्ताव आणि जालना जिल्ह्यातील बदनापूर विधानसभा मतदारसंघातील जुन्या कोल्हापुरी बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतर करून सिंचन क्षमता वाढविण्याच्या प्रस्तावांचा मंत्रालयात जलसंपदा मंत्री तथा गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळाचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आढावा घेण्यात आला. बैठकीत संबंधित विषयांवरील तांत्रिक, प्रशासकीय व कायदेशीर बाबींची सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत जायकवाडी प्रकल्पाच्या फेरनियोजनासंदर्भातील पाणी वापर, सिंचन क्षेत्र, विविध उपसा सिंचन योजनांचा समावेश तसेच सुधारित नियोजनाची अंमलबजावणी करण्याबाबत जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी आढावा घेतला. यासोबतच धरणातील मत्स्यबीज सोडण्याच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणीय, तांत्रिक व प्रशासकीय बाबींचा विचार करून संबंधित विभागांनी समन्वयाने पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले. जालना जिल्ह्यातील बदनापूर, भोकरदन व जाफ्राबाद परिसरातील जुन्या कोल्हापुरी बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतर करून सिंचन क्षमता वाढविण्याच्या प्रस्तावाचाही आढावा घेण्यात आला. यासाठी आवश्यक सर्वेक्षण, तांत्रिक मान्यता व पुढील प्रशासकीय प्रक्रिया प्राधान्याने पूर्ण करण्याबाबत मंत्री विखे पाटील यांनी निर्देश दिले. यावेळी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी राज्यातील जलसंपदा प्रकल्पांचा अधिक परिणामकारक वापर, सिंचन क्षमता वाढ आणि स्थानिक गरजांनुसार प्रलंबित प्रस्तावांवर वेळेत निर्णय घेण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश दिले. यावेळी आमदार नारायण कुचे, आमदार विलास भुमरे, आमदार प्रकाश सोळंके, ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांच्यासह गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक जयंत गवळी, यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# पिंपरी-चिंचवडमध्ये रंगणार रोईंग वर्ल्ड कप

- अंडर-19 व अंडर-23 आशियाई स्पर्धा; आयोजनासाठी ₹10 कोटींच्या आर्थिक सहाय्याची मागणी
- उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्यमंत्री तथा क्रीडा मंत्री सुनेत्रा पवार यांची भेट
- सुवर्णपदक विजेत्या लक्ष आणि उज्वल कुमार सिंह यांचा गौरव

■ मुंबई (दै. संध्या)

स्वित्झर्लंडमधील ल्युसर्न येथे झालेल्या रोईंग वर्ल्ड कप–III स्पर्धेतील लाईटवेट मेन्स डबल स्कल्स प्रकारात सुवर्णपदक पटकावत भारताचा तिरंगा जागतिक स्तरावर अभिमानाने फडकविणाऱ्या भारतीय खेळाडूंच्या ऐतिहासिक यशानंतर आता रोईंग वर्ल्ड कप अंडर-19 व अंडर-23 आशियाई स्पर्धेचे आयोजन पिंपरी-चिंचवड येथे होणार आहे. या पार्श्वभूमीवर स्पर्धेच्या आयोजनासाठी महाराष्ट्र शासनामार्फत आवश्यक आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.



महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन यासंदर्भातील निवेदन सादर केले. पिंपरी-चिंचवड शहरातील कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग (CME) परिसरातील आर्मी रोईंग नोड (ARN) येथे ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा होणार असून, स्पर्धेच्या स्थळाची उभारणी, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा, अत्याधुनिक उपकरणे, तांत्रिक व्यवस्था, सुरक्षा, खेळाडूंची निवास व्यवस्था, वाहतूक तसेच इतर आवश्यक सुविधांसाठी सुमारे ₹१० कोटींचा खर्च अपेक्षित असल्याचे शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या निदर्शनास आणून दिले. या खर्चासाठी राज्य शासनाकडून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. यावेळी रोईंग वर्ल्ड कप–III स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते लक्ष आणि उज्वल कुमार सिंह यांचा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. दोन्ही मान्यवरांनी खेळाडूंच्या ऐतिहासिक कामगिरीचे कौतुक करत आगामी स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी अण्णा बनसोडे म्हणाले की, सुवर्णपदक विजेते खेळाडूंनी पिंपरी विधानसभा मतदारसंघातील आर्मी रोईंग नोड (ARN) येथे कठोर सराव करून आपल्या यशाची भक्कम पायाभरणी केली आहे. त्यामुळे त्यांचे हे यश केवळ देशासाठीच नव्हे, तर पिंपरी विधानसभा मतदारसंघासाठीही अत्यंत अभिमानास्पद आहे. यावेळी सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंनी आपल्या यशामागील कठोर प्रशिक्षण, सातत्यपूर्ण मेहनत आणि आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी सुरू असलेल्या तयारीची माहिती उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना दिली. तसेच आर्मी रोईंग नोड (ARN) येथे उपलब्ध असलेल्या प्रशिक्षण सुविधांबाबतही सविस्तर माहिती देण्यात आली. आगामी रोईंग वर्ल्ड कप अंडर-19 व अंडर-23 आशियाई स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी राज्य शासनाकडून आवश्यक सहकार्य मिळाल्यास पिंपरी-चिंचवड शहराला आंतरराष्ट्रीय क्रीडा नकाशावर नवी ओळख मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी कार्यवाही करावी

■ मुंबई (दै. संध्या)

चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील वन क्षेत्रात जमिनी असणाऱ्या शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील वनपट्टे संदर्भात विधिमंडळाच्या मंत्रिमंडळ सभागृहात बैठक झाली. यावेळी वन मंत्री गणेश नाईक, आदिवासी विकास मंत्री प्रा. अशोक वुईके, आमदार देवराव भोंगळे, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, चंद्रपूरच्या जिल्हाधिकारी वसुमना पंत आदिसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जिवती तालुक्यातील अनेक गावांमध्ये जमीन महसूल अभिलेखात गाव म्हणून नोंद असताना वन विभागाच्या नोंदीत ती राखीव वनक्षेत्रात असल्याचे दिसून येते. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना डिजिटल सातबारा, पीएम किसानसह विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्यात अडचणी येत आहेत. १९८० पूर्वीच्या जमिनींसाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध झाल्यास त्या वनक्षेत्रातून वगळण्याची प्रक्रिया तुलनेने सोपी आहे. मात्र १९८० नंतरच्या जमिनींसाठी वनसंवर्धन कायद्यानुसार स्वतंत्र मंजुरी आवश्यक आहे. अनेक ठिकाणी पुरेशा कागदपत्रांचा अभाव असल्याने प्रस्ताव नाकारले जात आहेत. त्यामुळे या जमिनी वन क्षेत्रातून वगळण्यासंदर्भात तातडीने सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडण्यासाठी योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी. संबंधित गावांचे सर्वेक्षण करून आवश्यक पुरावे गोळा करण्यात यावे. तसेच ज्या शेतकऱ्यांचे डिजिटल सातबारा निघत नाही, त्यांना ऑफलाईन सातबारा देऊन किसान योजनांचा लाभ देण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले. जिवती तालुक्यातील तेलंगणा सीमेवरील १५ गावांमधील शेत जमिनींचे हक्क ठरवून सातबारा तयार करून अभिलेखामध्ये समावेश करण्यासंदर्भात विभागीय आयुक्तांच्या समितीने केलेल्या शिफारशीनुसार तातडीने कार्यवाही पूर्ण करावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# उद्योगांना सक्षम करून देशाची निर्यात वाढवण्यावर भर द्यावा

■ मुंबई (दै. संध्या)


**वर्ल्ड ट्रेड सेंटर येथील परिषदेत तज्ज्ञांचे आवाहन**

देशाची आर्थिक प्रगती आणि रोजगार निर्मितीमध्ये 'सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग' (एमएसएमई) अत्यंत महत्वाची भूमिका बजावतात. या उद्योगांना सक्षम करून भारताची जागतिक स्तरावरील निर्यात दुप्पट करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, असे प्रतिपादन वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे आयोजित 'निर्यात वाढवणे, आणि एमएसएमई सक्षम करणे' या विषयावरील विशेष सत्रात तज्ज्ञांनी केले. या कार्यक्रमात परकीय व्यापार महासंचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक राजेशकुमार मिश्रा, एक्झिम बँकेच्या व्यवस्थापकीय संचालक हर्षा बंगारी आणि एमव्हीआयआरडीसी वर्ल्ड ट्रेड सेंटरचे अध्यक्ष डॉ. विजय कलंत्री प्रामुख्याने उपस्थित होते. परकीय व्यापार महासंचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक राजेशकुमार मिश्रा यांनी सरकारच्या 'डिस्ट्रिक्ट एक्सपोर्ट हब' या महत्वाकांक्षी योजनेवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, "२०१९ मध्ये सुरू झालेल्या या योजनेची आता पूर्ण अंमलबजावणी होत आहे. याद्वारे देशाच्या ग्रामीण आणि अंतर्गत भागातील लघु व मोठ्या उत्पादकांना जागतिक बाजारपेठेशी जोडले जात आहे. महाराष्ट्रातील नाशिक, ठाणे, रायगड, जळगाव आणि मुंबई या जिल्ह्यांमध्ये जिल्हा न्याय निर्यात आराखड्यांवर काम सुरू आहे."

त्यांनी पुढे सांगितले की, नवीन 'निर्यात प्रोत्साहन मिशन' अंतर्गत एमएसएमई क्षेत्राला नॉन-फायनान्शियल ट्रेड बॅरियर्स पार करण्यासाठी ५० लाख रुपयांपर्यंतचे आर्थिक साहाय्य दिले जात आहे. तसेच ई-कॉमर्सच्या माध्यमातून लहान प्रमाणावर निर्यात करणाऱ्या उत्पादकांसाठी क्रेडिट गॅरंटी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. एक्झिम बँकेच्या व्यवस्थापकीय संचालक हर्षा बंगारी यांनी बँकेच्या विविध योजनांची माहिती दिली. त्या म्हणाल्या, "भारताच्या एकूण निर्यातीमध्ये एमएसएमई क्षेत्राचा वाटा जवळपास ५०% आहे. या उद्योगांना तांत्रिक आणि आर्थिक साहाय्य देण्यासाठी एक्झिम बँकेने 'उभरते सितारे' कार्यक्रम सुरू केला आहे, ज्याद्वारे डीप-टेक आणि हाय-टेक क्षेत्रातील संरक्षण व वैद्यकीय उपकरणे बनवणाऱ्या कंपन्यांना मदत केली जात आहे."

तसेच, एमएसएमईंना खेळत्या भांडवलाची अडचण येऊ नये म्हणून गिफ्ट सिटीमध्ये फॅक्टरींग सेवा सुरू करण्यात आली आहे, ज्यामुळे तारण नसतानाही इनव्हॉइसवर कर्ज मिळणे सोपे झाले आहे, अशी माहिती त्यांनी दिली. वर्ल्ड ट्रेड सेंटरचे अध्यक्ष डॉ. विजय कलंत्री यांनी लहान उद्योगांच्या बँकिंग समस्यांवर बोट ठेवले. ते म्हणाले की, "देशाच्या जीडीपीमध्ये एमएसएमईचा वाटा एक तृतीयांश इतका मोठा आहे. परंतु, तळागाळातील उद्योजकांना वेळेत आणि सुलभतेने कर्जपुरवठा मिळणे आवश्यक आहे. बँकांनी डिजिटल पोर्टलच्या माध्यमातून कर्ज मंजुरीची प्रक्रिया अत्यंत सोपी आणि पारदर्शक करावी." जागतिक स्तरावर अमेरिका आणि युरोपमधील भू-राजकीय तणावामुळे निर्माण झालेल्या आव्हानांचा उल्लेख करत त्यांनी भारतीय निर्यातदारांना लॅटिन अमेरिका, आफ्रिका आणि दक्षिण आशिया यांसारख्या नव्या बाजारपेठांचा शोध घेण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाला विविध औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी, निर्यातदार आणि एमएसएमई क्षेत्रातील उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. एक्झिम बँक आणि वर्ल्ड ट्रेड सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने या सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## माऊलींच्या रथाच्या बैलजोडी मानाचा पेच अखेर सुटला; रानवडे कुटुंबात तोडगा

■ हर्षवर्धन रानवडे यांना पुणे, उमेश रानवडे यांना सातारा तर तुळशीराम रानवडे यांच्याकडे सोलापूरची जबाबदारी

आळंदी (दैनिक संध्या) : संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या आषाढीवारी पालखी सोहळा सन २०२६ निमित्त श्रींच्या रथास बैलजोडी लावण्याच्या मानावर सुरू असलेल्या चर्चांना अखेर पूर्णविराम मिळाला असून, तडजोडीच्या सूत्रातून रानवडे कुटुंबाला जिल्हानिहाय बैलजोडी सेवा वाटप करण्यात आली आहे. विश्वस्त मंडळ, बैलजोडी निवड समिती आणि रानवडे कुटुंबीय यांच्यात झालेल्या सविस्तर बैठकीनंतर हा निर्णय जाहीर करण्यात आला. यंदा बैलजोडीचा पारंपरिक मान रानवडे घराण्याकडे असल्याने संबंधित मानकऱ्यांच्या निवडीकडे वारकरी, भाविक आणि स्थानिक नागरिकांचे लक्ष लागले होते. गेल्या काही दिवसांत या विषयावर विविध स्तरांवर चर्चा सुरू होती. अखेर सर्व बाजूंचा विचार करून सामंजस्याने निर्णय घेण्यात आला. बैलजोडी समितीचे अध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे यांनी संस्थानकडे सादर करण्यात आलेल्या शिफारशीनुसार पुणे जिल्ह्यात पालखी जाताना व परत येताना श्रींच्या रथास बैलजोडी लावण्याचा मान हर्षवर्धन प्रदीप रानवडे यांना देण्यात आला आहे. सातारा जिल्ह्यातील प्रवासादरम्यान जाताना व परतीच्या मार्गावर श्रींच्या रथासाठी बैलजोडी सेवा उमेश लक्ष्मण रानवडे बजावणार आहेत. तर सोलापूर जिल्ह्यातील पालखी मार्गासाठी तुळशीराम ज्ञानोबा रानवडे यांच्याकडे ही जबाबदारी सोपविण्यात आली असल्याचे प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे व पालखी सोहळाप्रमुख ॲड.राजेंद्र उमाप यांनी सांगितले. दरम्यान, बैलजोडी सेवेचा मान मिळावा या मागणीसाठी उमेश रानवडे यांनी काही दिवसांपूर्वी आळंदीतील महाद्वार चौकात उपोषण आंदोलन केले होते. त्यावेळी संबंधित विषयावर योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यानंतरही निर्णय न झाल्याने त्यांनी न्यायालयीन लढ्याची तयारी दर्शवली होती. यानंतर विश्वस्त मंडळ, बैलजोडी समिती आणि रानवडे कुटुंबीय यांच्यात पुन्हा चर्चा झाली. परंपरा, मानपान, कुटुंबीयांची भूमिका आणि पालखी सोहळ्याचे शिस्तबद्ध आयोजन यांचा विचार करून जिल्हानिहाय जबाबदारी वाटपाचा पर्याय स्वीकारण्यात आला. यावेळी प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे, पालखी सोहळा प्रमुख ॲड.राजेंद्र उमाप यांच्या हस्ते बैलजोडी सेवेच्या मानकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी विश्वस्त चैतन्य महाराज कबीरबुवा, पुरुषोत्तम महाराज पाटील, व्यवस्थापक माऊली वीर, बैलजोडी समिती अध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे, उपाध्यक्ष शिवाजीराव रानवडे, सदस्य नंदकुमार कुऱ्हाडे, विलास घुंडरे, रामचंद्र भोसले, ज्ञानोबा वहीले, रमेश कुऱ्हाडे तसेच रानवडे कुटुंबीय उपस्थित होते.

## वाहतूक नियमांचे पालन करा; अन्यथा होणार कडक कारवाई : विनोद पाटील



कवठे येमाई (दैनिक संध्या) : शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांनी शिरूर पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व नागरिक व वाहनचालकांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे जाहीर आवाहन केले आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर नाकाबंदी व विशेष पेट्रोलिंग दरम्यान कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही पाटील यांनी दिला आहे. पोलीस निरीक्षक पाटील यांनी नुकताच शिरूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी म्हणून पदभार स्वीकारला असून धडाकेबाज कामगिरी सुरु केली आहे.शिस्तप्रिय पोलीस अधिकारी असलेले पाटील यांनी वाहनचालकांना वाहन चालविताना वैध वाहन परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स) जवळ बाळगणे, वाहनावर पुढील व मागील बाजूस नियमानुसार क्रमांक प्लेट लावणे, तसेच आरसी बुक, विमा, प्रदूषण प्रमाणपत्र (PUC) आणि इतर आवश्यक कागदपत्रे अद्ययावत व वाहनासोबत ठेवण्याचे आवाहन केले आहे. याशिवाय, वाहन चालवताना हेल्मेट, सीटबेल्ट यांसारख्या सुरक्षाविषयक नियमांचे पालन करणे बंधनकारक असून, वाहनांच्या काचांवर बेकायदेशीर ब्लॅक फिल्म लावू नये,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.शिरूर पोलीस स्टेशनकडून वेळोवेळी नाकाबंदी व पेट्रोलिंगदरम्यान वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई केली जात आहे. कायद्याचे पालन करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये आणि रस्ते सुरक्षित राहावेत, यासाठी सर्व वाहनचालकांनी नियमांचे पालन करणे आवश्यक असल्याचे पोलीस प्रशासनाने म्हटले आहे."वाहतूक नियमांचे पालन करून सुरक्षित आणि जबाबदार नागरिक म्हणून पोलीस प्रशासनाला सहकार्य करा," असे आवाहन पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांनी केले आहे.

# पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी जय्यत तयारी

सासवड (दै. संध्या)

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचा आषाढवारी पालखी सोहळा येत्या ११ आणि १२ जुलै रोजी संत सोपानकाका महाराजांच्या सासवड नगरीत मुक्कामी येत आहे. त्यानंतर १२ जुलै रोजी संत सोपानकाकांचा पालखी सोहळा पंढरपूरकडे मार्गस्थ होणार आहे. या सोहळ्यासाठी लाखो वारकरी सासवडमध्ये दाखल होणार असून, त्यांच्या स्वागतासाठी सासवड नगरपालिकेने आतापासूनच जय्यत तयारी सुरू केली आहे.

पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी सासवडच्या पालखी तळासह शहरातील ज्ञानेश्वर महाराज व संत सोपानकाका महाराजांच्या पालखी मार्गाची पाहणी नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांनी केली.



सासवड (ता. पुरंदर) : आगामी पालखी सोहळ्याच्या तयारीचा आढावा घेताना आणि पालखी तळाची पाहणी करताना नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप.

याबाबत अधिक माहिती देताना नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप व पाणी पुरवठा सभापती ज्ञानेश्वर गिरमे यांनी, पालखी काळापर्यंत पाऊस झाल्यास मुबलक पाणी पुरवठा करता येईल. मात्र पाऊस न झाल्यास पाणीपुरवठा व जलशुद्धीकरण केंद्रातून टँकर भरता येणार नाहीत. हे लक्षात घेऊन, सासवड परिसरातील १० विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या असून त्यांचे निर्जंतुकीकरण करून, त्याद्वारे वारकऱ्यांना आणि स्थानिकांना पाणीपुरवठा केला जाईल., तसेच पालखी तळ आणि संत सोपानकाका मंदिर परिसरात नळ कोंढाळ्यांची व्यवस्था करून त्याठिकाणी २४ तास पाणी पुरवठा करण्यात येणार असल्याचे सांगितले. पालखी तळावरील शौचालयांना देखील २४ तास पाणी पुरवठा करण्यात येणार आहे.

आरोग्य सभापती राजन जगताप यांनी, सोहळा काळात स्वच्छतेसाठी फिरते पथक, १५० कर्मचारी, १४ वाहनांची तसेच शहर परिसरात १६ ठिकाणी १८०० फिरत्या शौचालयांची उपलब्धता केली आहे. दिंड्यांना कचरा संकलनासाठी मोठ्या पिशव्या तसेच प्लॅस्टिकमुक्तीबाबत प्रबोधन व कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नगरपालिकेच्या विविध विभागांकडून सुरू असलेल्या कामांचा आढावा घेताना नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांनी, शहरातील प्रमुख मार्गांची दुरुस्ती, पालखी तळावर विद्युत रोषणाई, पथदिव्यांची दुरुस्ती आणि शहराच्या कानाकोपऱ्यात विशेष स्वच्छता मोहिमेला गती देण्यात आली असून, भाविकांची गैरसोय होणार नाही याची दक्षता पालिका प्रशासन घेत असल्याचे सांगितले.

याप्रसंगी उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, नगरसेवक सोपान रणपिसे, प्रदीप राऊत, नगर अभियंता सारिका कुंभार, पाणी पुरवठा अभियंता शितल जाधव तसेच मोहन चव्हाण, हनुमंत जाधव, अजिंक्य चौरे उपस्थित होते.

## शिरूरच्या कान्हूर मेसाई त पावसाची जोरदार हजेरी

कवठे येमाई (दै. संध्या)

सतत दुष्काळी म्हणून गणल्या जाणाऱ्या व डोंगरपठारावर असलेल्या शिरूर तालुक्यातील कान्हूर मेसाई गावात रविवारी दुपारी जोरदार पावसाने हजेरी लावली. श्री कान्हूर मेसाई देवी मंदिर परिसरासह संपूर्ण गावठाणात ढगफुटी सदृश्य मुसळधार पाऊस झाल्याने सगळीकडे काही क्षणात पाणीच पाणी झाले. रस्त्यांना तर ओढ्याचे रूप आलेले पाहावयास मिळत होते. मंदिर आवारातून पाण्याचा प्रचंड लोंढा वाहताना दिसत होता. झालेल्या तुफानी पावसाने परिसरातील वातावरणात गारवा निर्माण झाला. गेल्या काही दिवसांपासून पावसाची चातकासारखी वाट पहात असलेल्या नागरिक आणि शेतकऱ्यांना या पावसामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. या समाधानकारक पावसामुळे शेतातील पिकांना जीवनदान



मिळणार असून खरीप हंगामातील पेरण्यांनाही चालना मिळण्याची शक्यता सामाजिक कार्यकर्ते शहाजीराजे दळवी व शेतकऱ्यांतून व्यक्त केली जात आहे.घोलपवाडी, तांबे वस्ती याठिकाणी पावसाचे प्रमाण कमी असून काही ठिकाणी जोरदार, तर काही ठिकाणी हलका पाऊस परिसरात पडला असल्याचे ही दळवी यांनी सांगितले. पावसामुळे रस्त्यांवर काही काळ पाणी साचले असले तरी गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे . उर्वरित परिसरात व सर्वत्रच वरून राजाची कृपा होऊन भरपूर पाऊस व्हावा अशी अपेक्षा शेतकरी वर्ग करत आहे.

## शहराध्यक्षपदी वीरधवल गाडे, तर तालुकाध्यक्षपदी वैभव बुरुंगले यांची निवड!

बारामती (दै. संध्या)

■ 'संघटन सुजन अभियाना' अंतर्गत नियुक्त्या जाहीर; कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य

■ भाजपच्या भ्रष्टाचाराविरोधात लढा तीव्र करण्याचा नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा संकल्प





बारामती तालुक्यामध्ये काँग्रेस पक्षाची पाळेमुळे अधिक घट्ट करण्यासाठी आणि संघटनात्मक बांधणीला नवी गती देण्यासाठी पक्षाच्या वतीने महत्त्वपूर्ण निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत. बारामती तालुका काँग्रेसच्या शहराध्यक्षपदी वीरधवल गाडे आणि तालुकाध्यक्षपदी वैभव बुरुंगले यांची अधिकृत निवड करण्यात आली आहे.काँग्रेसचे प्रांताध्यक्ष मा.श्री. हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशावरून या नियुक्त्या करण्यात आल्या असून,या तरुण व निष्ठावंत नेतृत्वामुळे बारामतीतील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये कमालीचे नवचैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या 'संघटन सुजन अभियाना' अंतर्गत निरीक्षकांनी बारामती जिल्ह्याला भेट देऊन स्थानिक नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी सविस्तर चर्चा केली होती.ब्लॉक अध्यक्ष नियुक्ती संदर्भात निरीक्षकांनी प्रदेश कार्यालयाकडे दिलेल्या शिफारशी आणि अहवाल विचारात घेऊन प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या निवडींवर शिक्कामोर्तब केले आहे. या निवडीनंतर बोलताना नवनियुक्त शहराध्यक्ष वीरधवल गाडे आणि तालुकाध्यक्ष वैभव बुरुंगले यांनी सत्ताधारी भाजप सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.ते म्हणाले, "सध्या देशात आणि राज्यात भाजपचा भ्रष्टाचार पराकोटीला पोहोचला आहे.युवकांमध्ये आणि सर्वसामान्य जनतेमध्ये सरकारच्या धोरणांविषयी प्रचंड नाराजी आहे.भाजपचा हा खरा चेहरा आणि त्यांचा भ्रष्टाचार आम्ही बारामती तालुक्यातील घराघरामध्ये पोहोचवणार आहोत."

पुढे बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, "देशात आज युवकांपासून सर्वसामान्यांपर्यंत आणि शेतकऱ्यांपासून ते देशाच्या महत्त्वाच्या मुद्द्यांपर्यंत सर्वच घटकांवर अन्याय होत आहे.हे सर्व ज्वलंत मुद्दे हाती घेऊन आम्ही रस्त्यावर उतरून लढणार आहोत आणि जनतेला न्याय मिळवून देणार आहोत.आगामी काळात काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांचे हात बळकट करण्यासाठी आणि बारामती तालुक्यात काँग्रेस पक्ष वाढवण्यासाठी आम्ही दोघेही रात्रीचा दिवस करू."

या महत्त्वपूर्ण जबाबदारीबद्दल दोन्ही नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे नेते आणि प्रांताध्यक्ष मा.हर्षवर्धनजी सपकाळ साहेब यांच्या मार्गदर्शनाबद्दल व विश्वासाबाद्दल त्यांचे मनापासून आभार मानले.पक्षाने दिलेली ही जबाबदारी पूर्ण निष्ठेने पार पाडू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

तसेच आगामी काळात प्रांताध्यक्ष मा.हर्षवर्धनजी सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली,आमदार विश्वजीत दादा कदम,आमदार सतेज उर्फ बंटी पाटील साहेब,काँग्रेस जिल्हाध्यक्ष लहू निवंगुने,युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष उमेश पवार आणि महाराष्ट्र प्रदेश सचिव आकाश दादा मोरे व ज्येष्ठ नेते अशोक भाऊ इंगुले यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती तालुक्यात पक्षाचे काम अधिक जोमाने पुढे नेणार असल्याचे गाडे व बुरुंगले यांनी संयुक्तपणे जाहीर केले.

## दादा बाबाजी वारघडे प्रतिष्ठानचे वृक्षलागवडीचे कार्य कौतुकास्पद : डॉ. यशवंत माने

कोरेगावमुळ (दै. संध्या)

वटपौर्णिमेचे औचित्य साधून ट्री टॉक फाऊंडेशन व दादा बाबाजी वारघडे प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने बकोरी देवराई वनराई प्रकल्पात वडाच्या वृक्षाचे वृक्षारोपण व पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी) डॉ. यशवंत माने यांनी दादा बाबाजी वारघडे प्रतिष्ठानच्या वृक्षसंवर्धन व जलसंधारणाच्या कार्याचे विशेष कौतुक केले.

बकोरी व केसनंद परिसरातील खडकाळ डोंगरमाथ्यावर गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने वृक्षारोपण





व संवर्धनाचे काम सुरू असून, आजपर्यंत एक लाखांहून अधिक झाडांची लागवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर सुमारे ५ कोटी लिटर वाहून जाणारे पाणी जमिनीत मुरविण्याचे महत्त्वपूर्ण जलसंधारणाचे कार्य पूर्ण करण्यात आले आहे. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विविध सण पर्यावरणपूरक पद्धतीने साजरे केले जातात. दसऱ्याला आपट्याचे झाड, दत्तजयंतीला उंबराचे झाड तर वटपौर्णिमेला वडाचे झाड लावून त्याचे पूजन केले जाते. या उपक्रमात अनेक महिला मोठ्या उत्साहाने सहभागी होऊन पर्यावरण संवर्धनाचा संदेश देतात. प्रकल्पात छत्रपती जलाशयाची निर्मिती, ७० टक्के औषधी वनस्पतींची लागवड, तसेच ४ हजार चौरस फुटांमध्ये ४ हजार झाडांचा अकीरा मियावाकी प्रकल्प उभारण्यात आला आहे. आज या वनराईत हजारो पक्ष्यांचे अधिवास निर्माण झाले असून त्यांच्यासाठी नियमित दाणा व पाण्याची व्यवस्था केली जाते. चंद्रकांत वारघडे व त्यांचे कुटुंब गेल्या दहा वर्षांपासून या संपूर्ण वनराईचे निस्वार्थपणे संगोपन करीत आहे. आजही अनेक भागात समाधानकारक पाऊस झालेला नाही. हवामान बदल, वाढते तापमान आणि भूजल पातळीतील घट लक्षात घेता झाडांची गरज पूर्वीपेक्षा अधिक आहे. विशेष म्हणजे खडकाळ व ओसाड माळरानावर झाडे लावणे आणि ती वर्षानुवर्षे जगविणे हे अत्यंत कठीण व आव्हानात्मक कार्य आहे. मात्र दादा बाबाजी वारघडे प्रतिष्ठानने हे अशक्य वाटणारे काम प्रत्यक्षात करून दाखविले आहे. यावेळी उपविभागीय अधिकारी, हवेली डॉ. यशवंत माने, गटविकास अधिकारी शेखर शेलार , अप्पर तहसीलदार लोणिकाळभोर तृप्ती कोलते, उपकार्यकारी अभियंता महावितरण निलेश रासकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड , सहायक अभियंता महावितरण अरुण पुजारी, परिमंडळ अधिकारी पुणे प्रमोद रासकर, मंडल अधिकारी संदिप जिंगाडे, वनरक्षक अंकुश कचरे, तलाठी संजय गारकर, ग्रामसेवक मनिषा इंगळे, वनरक्षक अनिल राठोड, तसेच संदीप कोलते, कमलेश बहीरट, ज्ञानेश्वर पाटेकर, सागर खांदवे, विक्रम घडदे, धणराज वारघडे, औदुत वारघडे, वामन तुपे, अविदास हरगुडे, प्रा.हनुमंत देशमुख, सर्जेराव कुटे, रामराम कुटे, नवनाथ वारघडे, विघ्नेश कोलते, माया वारघडे, ज्योती कोलते, पूजा बहीरट, मंगल घडदे आदी मान्यवर उपस्थित होते. वनराई प्रकल्पाची सविस्तर माहिती वृक्षमित्र चंद्रकांत वारघडे यांनी दिली.

## भिगवणमध्ये रेल्वे भूसंपादनाला शेतकऱ्याचा विरोध

### पूर्वसूचना न देताच घराजवळ खांब रोवले', उपविभागीय अधिकाऱ्यांकडे आक्षेप; पुणे-सोलापूर तिसऱ्या व चौथ्या रेल्वे लाईनसाठी जमीन संपादन

भिगवण (दै. संध्या)

■ नुकसानभरपाईबाबत अनभिज्ञ असल्याचा आरोप

पुणे-सोलापूर तिसरी व चौथी रेल्वे लाईनच्या भूसंपादन प्रक्रियेवर भिगवण स्टेशन येथील शेतकरी मालती शिवाजी रांधवण यांनी गंभीर आक्षेप नोंदवला आहे. रेल्वे प्रशासनाने कोणतीही पूर्वसूचना न देता थेट घराजवळ खांब रोवले असून, नुकसान भरपाईबाबत कोणतीही स्पष्टता दिली नसल्याचा आरोप करत त्यांनी बारामतीचे उपविभागीय अधिकारी यांच्याकडे लेखी निवेदन दिले आहे. पुणे-सोलापूर रेल्वे मार्गावर तिसरी व चौथी रेल्वे लाईन 294/25 आणि 294/27 अपलाईन आर.एस. बाजू टाकण्याचे काम प्रस्तावित आहे. या कामासाठी भिगवण स्टेशन येथील सिटी सर्व्हे क्र. 1849, 1844, 1846 या जमिनीचे भूसंपादन केले जाणार आहे.



शेतकरी मालती रांधवण यांच्या मालकीच्या या जमिनीवर राहते घर, दोन शेड, फळझाडे, गोबर गॅस प्लांट, बोअरवेल व वॉल कंपाऊंड आहे. त्यांचे म्हणणे आहे की, "आमच्या मालकीच्या जमिनीवर रेल्वे प्रशासनाने आम्हाला कोणतीही पूर्वसूचना न देता घराजवळ खांब रोवले आहेत. या प्रकल्पातील मालमत्तेचे नुकसान आणि मोबदल्याबाबत प्रशासनाने कोणतीही स्पष्टता दिलेली नाही." दिनांक 29/06/2026 रोजी दिलेल्या निवेदनात रांधवण कुटुंबीयांनी खालील मागण्या केल्या आहेत:

**शेतकऱ्यांचे आक्षेप**

- पूर्वसूचना नसणे: रेल्वे प्रशासनाने आम्हाला कोणतीही पूर्वसूचना न देता घराजवळ खांब रोवले आहेत.
- माहितीचा अभाव: या प्रकल्पातील मालमत्तेचे नुकसान आणि मोबदल्याबाबत प्रशासनाने कोणतीही स्पष्टता दिलेली नाही.

1. सविस्तर वृत्तांत द्या: भूसंपादनामुळे होणाऱ्या नुकसानीचा सविस्तर वृत्तांत देण्यात यावा.
2. संयुक्त बैठक घ्या: जोपर्यंत अधिकृत माहिती मिळत नाही, तोपर्यंत काम करण्यास आक्षेप आहे. रेल्वे अधिकारी, प्रशासकीय प्रतिनिधी आणि शेतकरी यांची संयुक्त बैठक आयोजित करावी.

प्रशासनाची भूमिका

बारामती कार्यालयात हे निवेदन आवक-जावक संकलक यांच्याकडे दाखल करण्यात आले आहे. यावर प्रशासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भिगवण स्टेशन परिसरातील अनेक शेतकऱ्यांची घरे या प्रकल्पात जात असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. "पिढ्यानपिढ्या राहत असलेली घरे एका रात्रीत जाणार असतील, तर आम्ही न्याय मागायचा कुणाकडे?" असा सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. पुणे ते सोलापूर रेल्वेची तिसरी व चौथी लाईन वाढवण्याच्या संदर्भामध्ये रेल्वेने जो निर्णय घेतला आहे तो कोणालाही विचारात न घेता त्याची मोजणी व खांब रोवण्याचे काम रेल्वे प्रशासनाकडून होत आहे त्यामुळे सर्व लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे नक्की काय विषय आहे कोणाच्याही लक्षात येत नाही त्यामुळे मोजणी करणाऱ्या अधिकाऱ्याला जाब विचारून तुमचे वरिष्ठ अधिकारी यांना येथे बोलून जे जे क्षेत्र बाधित होत आहे त्या सर्वांची मिटींग लावून तुम्ही बाधित होणाऱ्या विषयी काय निर्णय घेणार आहे याची माहिती दिल्याशिवाय पुढील काम करू दिले जाणार नाही असा इशारा या ठिकाणी साहेबांना देण्यात आला त्या संदर्भ मध्ये कृषिमंत्री दत्ता मामा भरणे यांची भेट घेऊन सर्व घटना त्यांना सांगितली आहे मामानी प्रांत साहेबांशी संपर्क साधून बाधित होणाऱ्या सर्वांना न्याय कसा देता येईल ते पाहावे त्यानंतर सर्वांनी प्रांत ऑफिस बारामती येथे जाऊन सर्वांनी हरकती नोंदविल्या आहेत ज्यांनी हरकती घ्यायचे राहिले आहेत त्यांनी तीन तारखेच्या आत आपली हरकत प्रांत ऑफिसला देणे गरजेचे आहे सर्वांना विनंती आहे.

